किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
.... .... ०।०६
दुसर ..... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

Single copy ... ... ... ...

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 3 JUNE 1895 NO 21

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ३ माहे जून सन १८९५ इ० अंक २१

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धीशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हाताम कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरें झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचें व विशेष माहितीचें, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## 'SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji— Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) नेमल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०।०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## पत्रव्यवहार

दारव्हा ता. २८।५।९५

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते—यांस

वि० वि० येथें लोकल बोर्ड होऊन २ वर्षे झालीं एक वर्षभर चेअरमन रा. रा. विनायक आप्पाजी काणें हे होते. लोकांस आपलेसें करून हे कर्मे करीत असत. लोक यास फार खुष असून त्यांच्याच सल्यानें सार्वजनिक कामें करण्यास शिकत असत.

हल्लीं राजश्री विनायकराव बदलल्यामुळें लोकांच्या सोयी पूर्वीं प्रमाणें लक्षांत घेतल्या जात नाहींत. पोलीस आक्टाच्या ३४ व्या कलमाचा प्रयोग लोकांवर शस्त्रप्रहारा प्रमाणें होत आहे. लोक अडाणी आहेत कायदा कानू फारसा माहित नाहीं. सर्व गोष्टी मुख्य तालुका आफिसरांच्या नजरेस येत नाहींत त्यामुळें अन्याय व जुलूम होतो. एकतरें रस्ताच बंद झाल्या सारखा दिसतो आणि त्यामुळें गरीब लोकांस दवाखान्यावरून ३०० यार्डांचा लांब फेरा घ्यावा लागतो. तालुका आफिसरांनीं जुन्या राजा प्रमाणें गुप्तरितीनें वेष पालटून चौकशी करावी म्हणजे लोकांच्या हालांची दाद लागेल आणि रय्यत व हाताखालील लोक दुवा देतील. कळावें.

आपला
लोक कैवारी

## हिंदुस्थानची राजनीति

[ २० अं. व. पुढें चालू ]

हिंदुस्थानांत शांततेनें राज्य कारभार चालवितां येण्यास तो इंग्लिश राज्यतत्वांस अनुसरूनच असला पाहिजे:— व्हिक्टर इम्यान्युएल आणि गारिबाल्ड यांनीं इटली देशांत जो प्रकार केला तसाच प्रकार हिंदु लोकांनीं एका प्रतिस्पर्धी राष्ट्राच्या मदतीनें आपल्या सत्तेविरुद्ध हिंदुस्थानांत करून, सर्व अमेरिका, इतर यूरोपिन राष्ट्रें व अर्धे अफ्रिक इंग्लंड त्याच्या पक्षा कडील झालें आणि मुंबई व कलकत्ता हीं रोम आणि व्हेनिस बनलीं तर कसें होईल बरें! अशा रीतीनें शांततेचा भंग कदाचित् दहा वर्षांनीं होईल अथवा शंभर शंभर वर्षांनीं होईल; पण एकोणिसाव्या शतकांत हरएक गोष्ट पाल्यानें घडून येत असते, म्हणून आपण जुल्मी राजाचें अनुकरण केलें तर अशा जुल्मी राजाचा जो परिणाम तोच आपलाही झाला पाहिजे. आपला तसा परिणाम होण्याला आपण अजून पात्र झालें नाहीं; त्या दिशेनें आपलें वर्तन वडत आहे असें अद्याप उघड दिसून येत नाहीं; पण ह्या दिशेच्या अगदीं विरुद्ध दिशेनें जर आपण वागलों नाहीं, इंग्लिश तत्वांस अनुसरून जर हिंदुस्थानचा कारभार चालविला नाहीं तर थोड्याच वर्षांनीं आपल्या विरुद्ध चळवळ उडाली असतां आ-

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईंत फार दिवसांपासून चालू असून आह्मा पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातींचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोष्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहीमान स्ट्रीट, मुंबई.

म यांचें आपल्यास अवलंबन करावें लागणार नाहीं काय? सुशिक्षित नेटिव्ह लोक, सभा आणि वर्तमानपत्रें हीं जीं आपलीं शस्त्रें आहेत त्याच शस्त्रांनीं लढण्याच्या कामीं दिवसें दिवस तरबेज होत चालले आहेत आणि त्यांना, आपल्या पक्षाकडे अनुकूल करून घेतलें नाहीं तर ते आपल्यास प्रतिकूल झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

१६ सरकार आपमतलबानें अंधदृष्टि बनलें म्हणजे उपद्रवणारीं विघ्नें— लाभ होतो म्हणून कुकर्म करितां कामा नये. हानि होईल किंवा आपल्या स्वार्थसाधु मूढ दृष्टीनें जी गोष्ट हानिकारक वाटते ती प्राप्त होईल या भितीनें सत्कर्म करण्यापासून न ढळणें हेंही आपलें कर्तव्य आहे. जगाची गती कांहीं स्तब्ध नाहीं हल्लीं समाजाचें उत्क्रमण आणि बुद्धीचा विकास झाला आहे याचा मूळ पाया व निमित्तकारण इंग्रजी राज्य होय. युरोपांत, अमेरिकेंत आणि चिनांत आपल्या नजरेस आल्या प्रमाणें व येत असल्या प्रमाणें हिंदुस्थान देशही या प्रगमनाच्या वेळीं दुःखमय स्थितीच्या आणि अनिर्वेद्य संकटाच्या फेऱ्यांतून पार पडला पाहिजे. जुन्याला चिकटून निश्चल व अभेद्य राहणाऱ्या देशाला चिन देशाचा दृष्टान्त देतात आणि तशाविषयीं चिनची सर्वत्र ख्याति आहे पण या देशांत धर्मविषयक व समाजविषयक क्रांतीनें सर्वत्र चळवळ उडाली आहे आणि त्या क्रांतीचे परिणामही असंख्यात आहेत. ती क्रांती या देशांत कशी घडेल किंवा तिची सुरवात कशी होईल हें आह्मास सांगता येत नाहीं. कदाचित् एखाद्या नेटिव संस्थानांत तिचा उद्गम होतो, किंवा एखादा धर्म म्हणून ती दृश्यमान होते किंवा वाहिबी, शिख अगर ख्रिस्ती धर्मांच्या सुधारणेच्या द्वारें ती बाहेर येते किंवा जावा बेटांत डच लोकांनीं पराकाष्ठेचा जुलूम केल्यामुळें जो उचबळणारा लोकांचा पाट फुटला त्याचा प्रतिध्वनी म्हणून ती अस्तित्वांत येते हें कांहींच सांगवत नाहीं. ही क्रांती केव्हां होणार हेंही पक्कें नाहीं पण इतकें खरें कीं दहा वर्षांत म्हण अगर एक शतकभरांत म्हणा ही क्रांति होणार हें खचित. या क्रांतीचीं उद्दीपक कारणें प्रचलित आहेत, या क्रांतीची भट्टी हर पेटलेलीच आहे. आणि जें निरवयव द्रव्य होतें तें सावयव व सजीव झालें आहे. आपल्या समोर प्रश्न एवढाच आहे कीं, जेव्हा ही घडून येईल तेव्हां तिला आपण तयार असूं किंवा तयार असणार नाहीं. आपण ही क्रांती ओळखून एकत्र होऊं आणि [illegible] च दिशेनें तिचा फायदा करून घेऊं किंवा [illegible] प्रमाणें धडपडत व लोळत जाऊं या [illegible] नेकाल लागावयाचा आहे.

[illegible] नेटिव लोकमताला झुगारून दिल्यामुळें [illegible] णारे दुष्परिणाम— नेटिव लोकांचे विचार मोकळेपणानें बाहेर आले पाहिजेत आणि वेळोवेळ नेटिवांच्या हक्का विषयीं वादविवाद झाले पाहिजेत म्हणजे त्या पासून राज्यकर्त्यांचा मोठा फायदा होईल आणि राज्यकारभारामध्यें पुष्कळ मदतही मिळेल. राजा व प्रधानमंडळ यांचे अभिप्राय व हुकूम नित्यात्या प्रसंगीं जलदीनें व अक्षरशः अमलांत येतात म्हणून त्या शिरस्त्या अन्वयें युरोपांतील अधिकारी लोक राज्यकारभारांतील मध्यवर्ती चालकांच्या बेबंदशाहीला देखील आज्ञाधारकपणानें मान देतात; पण समाजांतील मध्यम वर्गांतच सुशिक्षित लोकांचा चमू आढळतो आणि याच लोकांच्या चलनवलनानें व कर्तबगारीनें खरें राष्ट्र बनत असतें, आणि या मध्यम वर्गांतील लोकांचीं मनें मोडण्यास किंवा दुखविण्यास अधिकारी लोक माघार घेत नाहींत. त्यांचा सर्व जोर स्वतःच्या मर्दुमकीवर असतो. आणि म्हणूनच अशा कृतींनीं राज्यांत बंडें व क्रांत्या उद्भवतील हें अजून जाणतच आहों.

परंतु जें सरकार प्रचंड लोकसमुदायाच्या मताला व विचाराला कांहीं महत्त्व देत नाहीं व तिलांजलीही देतें त्या सरकारच्या या सदामर्वकाळच्या राज्यपद्धतीची कल्पना केली म्हणजे आपणास काय वाटेल! इंडियांत ब्रिटिश सरकारच्या हातून अशा भयंकर चुका घडल्या नाहींत काय? सरकारच्या [illegible] व कौंसिलाच्या बाहेर लोकपक्षानें सरकाराला वारंवार प्रतिबंध करून राज्यकारभार सुयंत्रित केला तरच वरील भावी अरिष्ट टळेल आणि सरकारची बाजू भक्कम बनेल. लोकपक्षाचा शिरकाव झाला तर कौंसिलाच्या कामांत उदार तत्वाचा प्रवेश होऊन आरब्ध कार्यमालेला चांगला जोर येईल, नवीन केलेले कायदे कानू लोकमान्यता व वजनदारी प्राप्त होईल, आणि सरकारच्या राज्यकारभाराला चांगला भारदस्तपणा येईल.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती ज्येष्ठ शुद्ध ११ शके १८१७

---

वऱ्हाड प्रांताचा प्रश्न एकदम निकालास लावण्यांत इंग्रज सरकारचा फायदा नाहीं हें आह्मी ओळखून आहों. प्रांत परत करण्याची बुद्धि सरकारच्या अंतःकरणांत प्रज्वलित आहे असें प्रतिपादण्यास आह्मी तयार नाहीं. पण निश्चयानें प्रांत परत देण्यांत येणार नाहीं असें म्हणण्याचें सरकारच्या अंगीं धारिष्ट असेल असेंही आह्मास वाटत नाहीं. अशा स्थितींत जें चाललें आहे तें ठीक आहे हें सरकारदृष्टीनें उत्तम खरें पण त्यामुळें प्रजेचें फार नुकसान होत आहे एवढें कळविण्यापलिकडे आज अधिक लिहिण्याचें प्रयोजन आह्मास दिसत नाहीं.

## वसुलाचा उपक्रम

( नवीन धाऱ्या प्रमाणें )

खामगांव, जळगांव व मलकापूर या तीन तालुक्यांतील जमिनीवर नवीन आकारणी झाली आणि त्या निरखा बरहुकूम सारा वसूल केला जाईल अशा विषयीं कुळावर नोटिसा देखील बजावण्यांत आल्या आहेत नवीन जमाबंदी प्रमाणें सारा नव्या पीकावर द्यावा लागेल सरकारी हिशोबी साल एप्रिल महिन्यापासून सुरू होते आणि चालू हिशोबी सालची म्हणजे १८९५।९६ ची बाकी नव्या तरमपट्टी प्रमाणें सरकारांत घेतली जाईल.

साऱ्याची नवी ठरावबंदी चुकीच्या पायावर झाली. लोकांच्या गाऱ्हाण्यांचा सरकारनें मोठासा विचार केला नाहीं. अकोल्यास जी टोलेजंग जाहिरसभा भरली होती तिच्या मंडपांत या प्रश्नाचा पुष्कळ खल झाला आणि सरकारास सारा न वाढविण्या विषयीं विनंती करण्यांत आली. पण सर्व व्यर्थ! हल्लींची तरमबंदी अति भारी आहे ती सरकारला देऊन शेतांत राबणाऱ्याला पोटापाण्याची देखील पंचाईतच पडण्याचा संभव आहे. जमिनीचा कस उत्तरोत्तर कमी होत आहे, लोकांच्या पाशीं कांहीं त्राण उरलें नाहीं, जमिनीची कष्ट मशागत करण्यास भांडवलाची टंचाई पडते, पिकें चांगलीं येणें हेंही मोठें अनिश्चित असतें, आणि शेतांत जे हाडाचें पाणी करितात त्यांसही सावकार वगैरे भागवून वर्षभराच्या बेगमी पुरतें धान्य मिळत नाहीं. राज्यकारभाराच्या गरजा देखील अशा नाहींत, कीं सारा वाढविल्या शिवाय खर्च वेंच भागणार नाहीं. इतक्या गोष्टी खुल्या खुल्या करून कळविल्या असतांही सरकारनें आपल्या तुंबडीकडेच लक्ष पुरविलें आणि लोकांच्या हिताविषयीं अनास्था दाखविली हें आपलें दुर्भाग्य होय. पण प्रयत्न सोडता कामा नये आणि पार्लमेंट पर्यंत आपण दाद मिळण्यासाठीं मजल मारली पाहिजे.

नव्या तरमबंदी प्रमाणें वसूल करण्याविषयीं कांहीं नियम आहेत आणि त्या नव्या नियमाचें मूळ तत्व मोठें खुबीदार आहे. त्या नियमांचा भावार्थ असा कीं धारा फार वाढविला असला तथापि एकदम लोकांवर बोजा बसूं नये, लोकांस हळू हळू नवीन सारा देण्याची संवय लागावी, आणि जबर धाऱ्यामुळें लोकांत चलनिचल होऊं नये. ही अजब युक्ति म्हणजे कुळास आरंभाच्या कांहीं वर्षां पावेतो सूट देण्याचे प्रकार होत. ते प्रकार असे:—

जेथें सारा मूळ साऱ्याच्या सवाई इतका किंवा त्याहून कमी आकारला असेल तेथें सूट मिळणार नाहीं. जेथें सारा सवाई पेक्षां अधिक पटीनें वाढला असेल तेथें पहिल्या दोन वर्षीं फक्त शेकडा २५ या प्रमाणानें मूळच्या रकमेहून जादा सारा वसूल करावयाचा. नंतर नव्या तरमबंदीच्या तिसरे व चवथे वर्षीं मूळच्या साऱ्याच्या रकमेवर शेकडा ५० या प्रमाणानें सारा वाढवावयाचा. पण जर नवीन आकारणीचा वाढवा शेकडा पन्नासाहून कमी असेल तर तिसऱ्या वर्षापासूनच नवीन ठरावा प्रमाणें संपूर्ण सारा वसूल करण्यांत येईल. आणि जर [illegible] धिक असेल तर पांचवें आणि सहावें वर्षीं शेकडा ७५ या प्रमाणें मूळ साऱ्यावर अधिक वाढविलेला सारा घेतला जाईल. पण नवीन आकारणीची वाढ शेकडा ७५ हून कमी असेल तर पाचवें वर्षा पासून संपूर्ण सारा घेतला जाईल. शेकडा ७५ हून अधिक वाढ असेल तर सातवे वर्षा पासून संपूर्ण सारा वसूल करण्यात येईल. सारांश असा कीं, सारा शेकडा २५ हून अधिक पहिल्या दोन वर्षीं वाढवावयाचा नाहीं. पुढें प्रत्येक दोन वर्षांनीं मूळ साऱ्याच्या रकमेवर शेकडा २५ या प्रमाणें वाढ आकारण्यांत येईल. एकंदरीनें सारा वाढवून टरव बंदीच्या रकमे इतका वसूल होऊं लागे पर्यंत पहिल्या दोन वर्षीं मूळ साऱ्याची सवाई, तिसऱ्या व चवथ्या वर्षीं मूळ रकमेची दिढी आणि पांचव व सहाव वर्षीं मूळच्या पाऊणे दोन पट या पेक्षां अधिक सारा वसूल केला जाऊ नये.

खामगांव, जळगांव व मलकापूर या तीन तालुक्यात वरील नियमा प्रमाणें जमाबंदीचा वसूल १८९५।९६ सालीं केला जाईल. आणि जर एखाद्या कुळानें १८९६ मार्च पावेतों आपल्या जवळील जमिनीचा राजिनामा दिला तर मात्र त्याला नवीन आकारणींत वाढविलेली रक्कम परत दिली जाईल.

हल्लींचे साऱ्याचे दर जबर आहेत किंवा नाहींत हें ठरविण्या साठीं वायव्य प्रांता प्रमाणें या प्रांतीं कांहीं जमिनी सरकारनें रोजंदार माणसें ठेऊन वाहाव्या म्हणजे खऱ्या नफ्या तोट्याची चांगली कल्पना येईल. लोकांस शेती शिवाय उद्योग नाहीं म्हणून त्या नादान स्थितीचा अन्यथा फायदा घेऊन लोक राजीखुषीनें जमिनी नवीन धाऱ्याच्या अटीवर वाहतात तेव्हां नवीन धारा भारी नाहीं असा शास्त्रार्थ सरकारनें सांगणें म्हणजे यथान्याय होणार नाहीं. सरकारनें दांडगाई आरंभिली तर रयतेला पाठिंबा कोण!

---

महाराणी सरकारच्या जन्मदिवसाच्या उत्सवा निमित्त लहान मोठे किताब देण्याचा परिपाठ आहे. दरसाल प्रमाणें यंदाची नामावळी निरनिराळ्या किताबासह प्रसिद्ध झाली आहे. या यादींत बहुतकरून आमच्या प्रांताचा वाटा फार थोडा असतो किंबहुना एखाद्या वर्षी या प्रांतस्थ लोकामध्यें एकही मोहरा सरकारच्या बहुमान-सूचक किताबाला सत्पात्र ठरत नाहीं. नाइट ग्रांड कमांडर, नाइट कमांडर, सी. आय. इ., रावबहादूर, आदि करून किताबांचीं भांडारगृहें ज्यांच्या स्वाधीन आहेत त्यांच्यापाशीं वऱ्हाड प्रांताचा चांगलासा वशीला नाहीं म्हणून या प्रांतीं किताबांचा वर्षाव विरळ विरळ होत असतो.

पुष्कळ वेळा सरकारातून ज्याचा बहुमान होतो तो लोकमान्यच असतो असें नाहीं. लोकदृष्टीनें जो सामान्य सन्मानास देखील पात्र नसतो असा मनुष्य सरकारदरबारांत चांगला खुलतो. त्याची वाहवा होण्याचीं कारणें व कारस्थानें हीं मोठ्या लटपटीचीं, वशिल्याचीं, व हांजीहांजीपणाचीं असतात. तेव्हां सरकारी किताबा पासून अलिप्त असे पुष्कळ गृहस्थ कीर्तिमान, लोकहितेच्छु व कार्यदक्ष असतात. अशा लोकांच्या साध्या नामोच्चारानें देखील जे उत्तम गुण मनामध्यें श्रेणी रूपानें [illegible] थोडेंबहुतही सद्गुण सरकारी किताबवाल्यांच्या अंगीं नसतात. ही गोष्ट लोकांच्या प्रत्ययास वारंवार येते

परंतु जेव्हां जेव्हां लोकमान्य गृहस्थ किताबदानानें राजमान्यही होतो तेव्हां मात्र सरकारच्या बहुमानाची लोक थोरवी समजतात. आणि असें एक उत्कृष्ट उदाहरण आमच्या प्रांता संबंधानें आहे. हें उदाहरण म्हणजे कर्नल लेन साहेब यांस मिळालेला सी. आय. इ. हा किताब होय. कर्नल कलेक्टर टरनर लेन पोलीस, तुरुंग, रजिस्ट्रेशन, व स्टांप इतक्या खात्यांचे इन्स्पेक्टर जनरल

आहेत. हे वऱ्हाडांत अगदीं जुन्या सरदारा पैकीं आहेत. ह्यांची चाकरी आतां पेनशनला आली आहे. हे गृहस्थ नेटीव मंडळीस फार चाहतात त्यांच्या ...ता खालील चाऱ्ही खा- त्याचे लोक त्यांच्या न्यायप्रियतेला, कर्तव्य- दक्षतेला व मुत्सद्दीपणाला मध्या अ- भिमानानें माना डोलावितात. कर्नल साहे- बांच्या टापटिपीनें व नेमस्तपणानें ते आप ल्या सुप्रसिद्ध कं० मंडळीस प्रमाणें आहेत त्यांच्या कारभाराला नाखुष असा कोणीच आढळणार नाहीं आणि त्यांच्या पाशी जि- ल्हा सुपरिन्टेंडेंट सारख्या अधिकाऱ्या विरु द्ध देखील लवकर दाद मिळते. वर लिहि- लेली खातीं त्यांच्या कारकिर्दीत फार सुध रलीं आणि त्यांच्या गुणैश्वर्याच्या मानानें त्या स कंपानिअन आफ दी इंडियन एम्पायर हा किताब कांहीं मोठासा नाहीं पण त्यांच्या नामसंगानें किताबाला खरें महत्व आ- लें आहे. कर्नल लेन यांचा हा बहुमान पाहून वऱ्हाडांतील सर्व लोकवृंद आनंद पावेल.

———◦◦◦———

त्याच प्रमाणें ' राव साहेब ' या किताबाचा मान रा. रा. अंबादास संतो पेनशनर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस देण्यांत आला आहे राजश्री अंबादास पंत यांस राव साहेब बनवि लें ह्मणजे सरकारनें कांहींच केलें नाहीं. कोणा मनुष्याला कांहीं किताब दिला म्हणजे नवा नवा मल्यानें तो त्यांच्या नांवा पुढें लिहिण्याची मोठी हौस वाटते आणि किताब तरी लोकांनीं मोठ्या प्रेमादरानें नांवा पुढें जोडण्या साठींच दिला असतो. आमच्या मतें राजश्री अंबादास पंत यास राव साहेबासारख्या मोल्यवान उर्फ नांवाचा बहुमान पूर्वी पासूनच मिळत आहे आणि शिवाय एक्स्ट्रा असि० कमिशनर सार ख्या हुद्देदाराला राव साहेब हा किताब अंग- भूत असल्या सारखाच असतो. निदान राव बहादुराची पदवी तरी दिली पाहिजे होती आणि तीच देण्यानें अशा अधिकाऱ्यांचा स न्मान केल्या सारखा होतो आणि आमची समजूत या प्रकारची होण्यास दुसरें आणखी एक कारण आहे. मुंबईकडे सबार्डिनेट जज्जा स राव साहेब हा किताब त्याच्या अधिकारा बरोबरच मिळतो. राजश्री तात्या साहेब यांची चाकरी सरकारास फार पसंत पडली असें मात्र या किताबदानानें पक्केपणीं सिद्ध झालें. आणि ' जगा थोरपण नाहीं सुखासाठीं ' या नियमा- नें त्यांस लोकप्रिय व मनमिळाऊ होण्या साठीं किती चातुर्यानें, परोपकारबुद्धीनें व कर्तबगारीनें वागावें लागत असेल हें त्याचें त्यांसच ठाऊक. आह्मी रावसाहेब अंबादास पंत यांस दीर्घायुष्य, आरोग्य व भरभराट मनापासून इच्छितों आणि त्यांची रजा घेतों.

The Berar Samachar

MONDAY JUNE,
3, 1895

LEADERS OF MASSES
N VIII
( Communicated )

This man has a triple struggle to go through. His goal of ambition is either a struggle against nature, religion or society. These three ideas are cardinal points of human activity. They are not new. In all ages, in comparatively developed societies they are scattered about in the domain of human consciousness. But their outlines and colour are so dimly marked on the chart of that consciousness, and their existence is so feebly seen from amidst the shadows of passions of mankind, and the complex influence of human selfishness, that the ideas practically are lost to the dignity and goodness of man. They are impotent from these causes to assert their moral influence on the men's minds. Let all our actions be tested by their light. Let them be both subjective and objective motives of all our activites A habit to make these the central figures will be found to yield beneficial results. That much abused radical school in politics seems to gauge every fact by these standards, and although the surroundings made their opinions fantastic yet in the [illegible] aspects of the question they are perfectly right in the eyes of God and good men.

Nor can there be any objection to the discipline proposed on the ground that it may not suit our hereditary conceptions and ideas of things. In any innovation the pas is a serious consideration. Men who revolutionize a society or government often do so with the best of intentions; but the masses led by them are sometimes swayed by their past history, traditions, and conceptions of things; and a different type of progress from the one intended is the result. But no such fears should be felt. The ideas proposed are the ground-work of human existence, and they all lie at the root of progress. But the next question arises as to how these ideas are to be impressed and made the centres of our thought. Our present activity has been intense and primary leadership has been taken up by many in right earnest. Their labours ought to be commenced. We all should hope that they receive their reward in the realizations of their hopes.

In certain matters however that have recently prominently cropped up for discussion, certain persons seem to wish a sudden and forcible realization of their reforms. But this extraneous force in the first place means imbecility of their leadership rather than a wise, practical, and efficacious means to an end. The sense of a vast mass is never moulded by force. What in such cases the law enforces public opinion condemns. History gives abundant evidence of the force of this truth. Where the formation of an idea is the end such force and such interference should be avoided. Persuasion is perhaps the most potent engine of good. It undermines the stronghold of human prejudice by gradual approaches, and when the approaches are made sufficiently near, there is nothing so powerful, nothing so magnificent, so imposing as the reduction of that stronghold by an appeal to the imagination of the masses.

———◦◦◦———

We are glad to notice two names from Berar in the list of the Birthday Honors List. Colonel C. T. Lane is made a Companion of the Indian Empire. We congratulate him on his elevation to the said Order towards the eve of his retirement; and we mention this with special pride because this is a public recognition of his long, able and energetic services to the province. He is one of the oldest officer in the Commission and his connection with this province for nearly a generation has endeared him to those who served under him or somehow came in contact with him. He is a gentleman of strong characer. His regularity is proverbial in his departments; and the probity of his good self is exemplary. He is most honest, sincere and sympathetic in his treatment of the Natives. His long stay amongst us has almost indianized him and wherever he goes he will be welcomed with right earnestness because he is a treasure of so many sterling merits. He is rather retiring in his ways of life and his goodness is therefore an exclusive privilege of the Police, Jail, Registration and Stamp deparments. We gladly welcome him to the high honor that is now being bestowed upon him and wish this our new Companion of the Indian Empire long life, health and prosperity.

Mr. Ambadas Santo is the second gentleman who shares a little in the last Honors List. He is henceforth a Rao Sahib. His services as an Extra Assistant Commissioner thus receive an appreciative notice from the Government and we are very glad of it. He ought to have been made a Rao Bahadur but let us accept with good grace whatever little may come to us in the order of things.

## वऱ्हाड

हवामानः— उष्णतेचें मान उतरलें आ- हे. वारा तावाला २०।२९ मैल वहातो. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

नदीचें पाणी फार खराब झालें आहे कापशीहून आलेल्या नळाच्या पाण्याचा सां- ठा कमी कमी होत गेल्या मुळें गांवांत रात्रीं सहा तास पाणी सोडण्याचें बंद ठे वण्यांत आलें आहे.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. यांस तहशिलदाराची जागा स्वीका- रण्याविषयीं विचारणा झाली त्या प्रमाणें त्यांनीं दोनशे रुपये पगाराची जागा कबूल केल्याचें कळतें.

रा. रा. शिवराम रघुनाथ सेकंड क्लार्क डायरेक्टरची कचेरी यांची बदली हैदराबाद रेसिडेन्सी आफिसांत ९० रुपयांवर झाल्या अन्वयें ते परवा रात्रीं तिकडे रवाना झाले.

आणि त्यांच्या ८० रुपयांवर रा. रा. बळवंत विष्णु वैद्य यांस नेमून अखेरच्या ७५ च्या जागीं रा. रा. दामोदर कृष्ण टि- ळक यांस ट्रेनिंग कालेजांत नेमिलें. खालील नेमणुका कशा होतात पहावें.

### नोटीस

कमळजा मर्द सिधु पाटील राहणार किन्ही प्रगणे गेरु माटरगांव तालुके चिखली ईस.

खालीं सही करणार तुकाराम वल्लद बु- ढाजी पाटील राहणार किन्ही प्रगणे गेरु माटरगांव तालुके चिखली जिल्हा बुलढाणे. याज वरून नोटीस देण्यांत येते कीं आमचा चुलता सिधु वल्लद द्वारकु हा मरण पावल्यास सुमार सहा महिने झाले. त्याचे नांवानें चार शेतें, तीन वाड्याचीं घरें व दोन खुलीं घरें वगैरे स्थावर इस्टेट व जंगम इस्टेट गुरें ढोरें ह्मशी वगैरे आहेत सदर्हु इस्टेट तूं विकणार असें आमचे ऐकण्यांत आलें आहे. ही इस्टेट वडिलार्जित आहे. तरी ती विक- ण्यास अगर गहाण देण्यास अगर बक्षीस दे- ण्यास तुजला कोणतेही प्रकारें हिंदुधर्म शा- स्त्रा प्रमाणें आधार नाहीं. तूं सिधु वल्लद द्वार- का पाटील याची बायको असून त्या चे पासून झालेली तुजला मुलगा अगर मुलगी नाहीं. त्याचे जवळचे वारीस आह्मी आहों. तरी सदर्हू इस्टेट तूं कोणास गहाण खरेदी अगर बक्षीस देऊं नये. दिल्यास तें गहाण बक्षीस अगर खरेदी रद्द समजली जाईल. क- ळावें. ता० ३० माहे मे सन १८९५ इ०

( सही )

तुकाराम वल्लद बुढाजी पाटील राहणार किन्ही प्रगणे गेरु माटरगांव दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याज- कडून कळविण्यांत येते कीं आमचा चुलता नामें सिधु वा। द्वारकु पाटील राहणार किन्ही प्रगणे गेरु माटरगांव तालुके चिखली जिल्हा बुलढाणा हा सुमार सहा महिन्यापूर्वीं मरण पावला. त्याजला मुलगा अगर मुलगी कोणी नाहीं. जवळचे वारीस आह्मी आहों. सदर्हू सिधु वा। द्वारकु याचे नांवचीं चार शेतें, तीन वाड्याचीं घरें व दोन खुलीं घरें वगैरे स्थावर इस्टेट व खेरीज जंगम इस्टेट गुरें ढोरें ह्मशी वगैरे आहेत. त्याजला कोणाचें देणें नाहीं व लोकांकडून घेणें मात्र आहे. आमचे ऐक- ण्यांत असें आलें आहे कीं सदर्हू सिधु वा। द्वारक याची बायको कमळजा मर्द सिधु ही वरील इस्टेट विकणार आहे. परंतु सदर क- मळजा ईस ही इस्टेट विकण्यास कोणतेही प्र- कारें हिंदु धर्म शास्त्रा प्रमाणें अधिकार नाहीं. तरी सदर्हू इस्टेट किंवा याचे कोणताही भाग कोणी खरदी अथवा गहाण अगर बक्षी- स घेऊं नये. घेतल्यास ती खरेदी, गहाण, अगर बक्षीस रद्द समजलें जाईल. कळावें ता. ३० माहे मे सन १८९५ इसवी.

( सही )

तुकाराम वा। बुढाजी पाटील रा- हणार किन्ही प्रगणे गेरु माटरगांव दस्तुर खुद्द

———◦◦◦———

## जाहिरात

सर्व लोकांच्या माहिती साठीं प्रसिद्ध करण्यांत येते कीं नळाचें पाणी आज पासून दररोज रात्रीचे १० वाजल्या पासून सकाळचे ४ वाजे पावेतों सोडलें जाणार नाहीं. सर्वांनीं पाणी बंद होण्या पूर्वीं पाणी नेण्याची व्यवस्था करावी.

अकोला ता० २ जून सन १८९५ इ०

वामन नारायण काळे
सेक्रेटरी-मुनसिपल कामिटी, अकोला.

## वर्तमानसार.

कानड्यांचें लोक ऐकत नाहींत असें पाहून त्या खजिन्याचे ट्रस्टींनीं त्यांच्यावरील तो बोजा कमी केला. वेरुलवरील तो बोजा कमी करण्याचेंही ठरलें, आणि हिंदुस्थानचे लोक नेभळट सारखे वागत असल्यामुळें त्यांच्यावरील हा बोजा मात्र कमी करीत नाहीं. १८ लक्षांचा पाऱ्याचा खर्च हिंदुस्थानच्या खजिन्यांतून करूं नये अशाबद्दल आजपर्यंत कित्येक वेळ तक्रारी झाल्या. पण आमच्या खजिन्याचे ट्रस्टी त्याबद्दल विचारही करीत नाहींत.

पंढरपुरास भीमा नदीवर पूल बांधण्याचें ठरलें. खर्चाचा अदमास सहा लाखांचा आहे. ती रकम पुरी करण्याकरतां ती म्युनिसिपालिटी सरकारच्या मंजुरीनें खासगी सावकारांपासून ४,८९,००० रुपये ४ टक्याच्या व्याजानें तीस वर्षांत फेड करण्याच्या करारानें कर्ज काढीत आहे. बाकीची रकम म्युनिसिपालिटी व सरकार यांच्याकडून पुरी झाली आहे.

इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान एका आठवड्यांत जातां येतां यावें अशी एक रेल्वे करण्याचें एकानें योजलें आहे. त्याणें या रेल्वेचे ट्रान्स आरेबियन, ट्रान्स पर्शियन व ट्रान्स बलुचिस्थान हे रस्ते योजले असून खर्च १,५०,००,००० पौंड ह्मणजे सुमारें २५ कोट रुपये होईल असा अदमास आहे

१० नंबरी व त्याच्या आंतील सुताचा रंगवलेला कपडा जो विलायतेहून हिंदुस्थानांत येईल त्यावर आजपर्यंत नवीन ठरावाप्रमाणें पांच टक्के जकात होती ती आतां १॥ टक्का कमी केली आहे! ब्रह्मदेशाकडे तसला जो हिंदुस्थानी माल खपतो त्याच्या बदला विलायती खपण्याची सुरुवात व्हावी हा या ठरावाचा उद्देश आहे.

तहावरून घेतलेला लिओटंग प्रांत जपानानें चिनास परत देण्याचें जें कबूल केलें त्या बाबतींत कोणत्याही जपानी वर्तमानपत्रानें एक अक्षरही लिहूं नये असा जपान सरकारानें एक हुकूम केला आहे.

राशिया जी एक सैबेरियन रेल्वे तयार करीत आहे ती पीतसमुद्राच्या किनाऱ्यावर आणतां यावी ह्मणून राशियानें कोरिया आपल्या ताब्यांत घेण्याचा यावेळीं यत्न करावा असें राशियन पत्राचें ह्मणणें आहे.

अ० द०

आह्मास असें समजलें आहे कीं, सोलापुर तालुक्यांतील हगलूर या गांवीं सुमारें दीड महिन्यापूर्वीं कांहीं लोक गळ्यांत तुळसीच्या माळा व हातांत पताका वगैरे घेऊन घोड्यावर बसून जाऊन लोकांस असें सांगत होते कीं, आवसें येथील मप्पा महाराज (लिंगाईत लोकाचे गुरु) हे कांहीं गाई वांसरें सुमारें १०००।२००० काशीस नेऊन श्रीविश्वेश्वरास सोडणार आहेत वास्तव कोणास आपलीं गाई वांसरें नकोशीं असतील तर फुकट किंवा कांहीं जुजबी किंमत घेऊन द्यावीं आह्मी घेऊन तिकडे पावती करणार आहोंत. त्या गांवचे लोकांत एक दोन गृहस्थ गुरें बाजारांत विकण्यास नेणें आणणेंसाठीं नेहमीं बाजारांत जाणार असल्यामुळें त्यांनीं त्या लोकांस हे ज्या वेषानें आले आहेत ते ते नव्हेत, हे कसाई आहेत, असें ओळखलें. व त्यांस आपण अमुक ना ह्मणून विचारतांच ते लोक निघून चालते झाले या प्रमाणें त्यांचें कपट उघडकीस आलें.

पंढरपूरच्या पुजाऱ्यांवर देवाचे पूजेस हरकत केल्याबद्दल खटला होऊन त्यांस २० रुपये दंड झाला व त्यांजपासून चांगले वर्तणुकीबद्दल ९ महिन्याचे मुदतीचा २०० रुपयांचा जामीन घेण्याचा हुकूम झाला. तसेंच चौघां वेणाऱ्यांनीं काकड आरतीचे वेळीं गर्दी केली ह्मणून त्यांस ३।३ महिने सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या.

क० त०

फिलिपाईन बेटांत कित्येक नारळाच्या झाडावरील नारळांतून मोठीं व मोठी व पाणीदार मोत्यें सांपडतात.

मो.

पाषाण वृष्टि—गेल्या महिन्याचे २६ वे तारखेस दिवसा ९॥ वाजण्याचे सुमारास मिर्जापुरापासून सुमारें १७ मैलावर जोधपुरच्या सिमेवर आकाशातून दगडाची वृष्टी झाली.

न्या. सिं.

अश्वमांस—गतवर्षीं फ्रान्स देशांत ४६१९ टन घोड्यांचें मांस फ्रेंच लोकाच खाण्यात आलें !

चांदीचीं भांडीं व दागदागिने ठेवावयाच्या पेटींत कापूर ठेवीत जावा ह्मणजे ते चांदीचे पदार्थ कधींही मळकट होत नाहींत, असें एकानें अनुभव घेऊन प्रसिद्ध केलें आहे

ज्ञा. च.

पारिस येथील बुलवर्ड भागांत एका घरांतील नवरा बायको एक दिवशीं नाटक पाहण्यास गेले असतां, एका मनुष्यानें त्या नवऱ्यावर 'हिपनाटिझम' विद्येनें भुलभुलावणीचा प्रयोग केला. नंतर तें दंपत्य घरीं येऊन निरनिराळ्या खोलींत निजलें. पण नवऱ्याच्या प्रकृतीबद्दल बायकोस कांहीं संशय येउन, ती त्याच्या खोलींत जाऊन पाहूं लागली तों कोणी एक मनुष्य, तिजोरीच्या पेटींतून नगद माल काढित आहे व नवरा प्रत्यक्ष पहात आहे. या स्त्रीला पहातांच त्या माणसानें कांहीं पोर्तुगीज भाषेंत शब्द उच्चारले. व त्यासरसे नवऱ्यानें आपल्या स्त्रीस दाबून धरिलें, व त्या माणसास सर्व नगद माल नेऊं दिला, मागाहून बऱ्याच वेळानें नवरा शुद्धीवर आला, परंतु त्याला झालेल्या गोष्टींचें कांहींच स्मरण नव्हतें. पुढें त्या चोरास पकडण्यांत येऊन त्यानें हिपनाटिझमनें हें दुष्कृत्य निर्धास्त केलें असें बाहेर आलें आहे.

जुनागडच्या प्राचीन काळच्या सुदर्शन नांवाच्या सरोवरासंबंधीं चमत्कारिक माहितीचा लेख, गिरनारच्या पायथ्याशीं सांपडला आहे.

आजकाल आफ्रिका खंड हें युरोपच्या देशानां एक मोठें कुरणच सांपडलें आहे. तेथें यथेच्छ चरून पुष्ट होण्याची इच्छा युरोपच्या सर्व राष्ट्रांना [illegible] काय परिणाम होतो तें पहा यांचे आहे. धाधावलेल्या बुभुक्षितांच्या चढाओढीचा परिणाम काय होईल हें कोणी सांगावें! याच लटपटींत, इंग्रजांनींही आपल्या व्यापाराचा पायरव आफ्रिकेंत बराच स्थळ केला आहे.

स० वि०

होळकराचें राज्य सर्वांचें माहेरघर असतां अलिकडे तें राज्य ह्मणजे यमाची यमपुरी, चोराची हरामनगरी व दुर्व्यसनाची माळदोरी बनून राहिल्याचें ऐकून अत्यंत खेद वाटतो. श्री० बाळासाहेबांच्या अमलांत असा कहर उसळणें ह्मणजे आईनें लेकराचा उच्छेद करणें होय. ज्या तुकोजी रावाच्या हयातींत लोकांनीं धन व सत्ता मोठ्या मर्दुमकीनें संपादन केली त्या शहरांत सर्व उचल्याचा बाजार होणें अत्यंत दुर्दैव समजलें पाहिजे. खरेंच असें आहे काय?

रशिया पावला पावलानें ढकलत सरहद्द वळांडण्याच्या बेतांत आहे. पुढें मागें हा रशियन झार हिंदुस्थानांत कशा घाटानें वरांत शिरेल तें सांगवत नाहीं. आज काल काबुलचा अमीर विरेस धरल्यासा दिसतो. पण हे मुसलमान भाई जेर जबर निमाज पढण्याचें मिस दाखवून त्या इंग्लंडांत राशियास हिंदुस्थानच्या सरहद्दीवरची दिंडी केव्हां उघडून देतील याचा नेम नाहीं.

स्पिरिट आफ वाईन मध्यें मीठ व थोडें केशर मिश्रण करावें त्यांत तागा जाड दोरी भिजवून पेटवावी. त्या प्रकाशात प्रत्येक पदार्थ । भयकर दिसावा दृष्टीस पडतो.

म. भि.

चागल्या स्त्रीला जग काय तें एक आपलें घर असें वाटूं लागतें, आपलीं मुलें बाळें हेंच त्यांतील सुखवस्तु प्राणी; आपला पति हाच प्रीतिविश्वावर राज्यकरणारा राजा आणि आपण स्वतः या चिमुकल्या प्रीतिविश्वांतील लक्ष्मी एकंदरींत अशा गोड व उदात्त विचारांनीं ज्या घरांतील मनुष्यांचीं मनें ओतप्रोत भरून जातात तेथें सुखाला काय कमी आहे! त्या घराला इहलोकींचें "लक्ष्मीविलासमंदिर" असें ह्मटलें असतां शोभेल. खरोखर गृहसौख्य ह्मणून जें कांहीं ह्मणतात तें हेंच, व हेंच घर "जगांत खरें सुखाचें निधान."

'संयोगजलाला कारण' हा ह्मण एकदां भोळ्या गवळ्यानें ऐकिली व तेव्हां पसून तो दुधांत पाणी घालतांना नेहमीं ह्मणतो, "मी पाण्याचा व दुधाचा संयोग करतों यांत मुळींच वावगें नाहीं. माझ्या त्या दुधाच्या अंगीं ताकद ज्यास्त येते.

क.र०

कोंकणांत जाणाऱ्या आगबोटी एकाच मालकाच्या हातीं असल्यामुळें उतारू नेण्या आणण्याचे दर व त्या लगतची इतर व्यवस्था मन मानेल त्या प्रमाणें करण्याचा क्रम त्यानीं चालविल्या मुळें गरीब उतारूं लोकांचें पैशा संबधानें नुकसान होऊं लागलें आहे. या खेरिज इतरही गैरसोयी होऊं लागल्या आहेत.

दी० बं०

बंगाल इलाख्यांतील सितमरी सब डिविजनांतील [illegible] लोकांचें वर्तन इतकें वाईट आहे कीं त्या मुळें त्यांच्यावर जादा पोलिस बसवावें, आणि त्या पोलिसांचा खर्च लोकांवर कर बसवून भरून घ्यावा असा बंगाल सरकारानें नुकतांच ठराव काढिला आहे. असें अमृत बझार पत्रिके वरून समजतें. कांहीं बदमाष लोकांच्या दुर्वर्तनामुळें सगळ्या गांवावर जादा पोलिस ठेऊन त्याच्या खर्चा साठीं गांवावर कर बसवावें, आणि आधींच अर्धपोटी राहणाऱ्या लोकांचें ह्या कराच्या रूपानें अन्न नाहींसें करून त्यांस असंतुष्ट करावें हा कोणत्या मुलुखाचा न्याय!

शु० सू०

बापट कमिशन— ह्या कमिशननें जो रिपोर्ट केला आहे, त्यांत मि. बापट यांस सर्व आरोपांतून मुक्त करण्यांत आलें असून सरकारी कामाच्या पद्धतींत जे दोष कमिशनास दिसले, ते सुधारण्या विषयीं त्यानें शिफारस केली आहे अशी दाट वदंता असल्याचें समजतें; हा रिपोर्ट माहाराजांकडे उटकामंड येथें जाणार व तेथून ते अखेर हुकूम करणार.

ता. २९ च्या बां. ग्या. त मि. जे. पी. निकसन नांवाच्या यूरोपियन गृहस्थांनीं मुंबई इलाख्यांतील लॅन्ड रेव्हिन्यूच्या दोषास्पद पद्धतीचे संबंधानें एक पत्र लिहिलें आहे तें मुंबई सरकारानें फार विचार करण्यासारखें आहे. "जमिनीवरील सारे वाढल्याबद्दल लोकांची तक्रार आली, तर त्याचा पडताळा पाहाण्याकरितां एक वर्ष सारा वाढलेल्या जमिनीची लागवड सरकारांतुन करून पाहावयाची, ह्मणजे लोकांचें ह्मणणें खरें आहे कीं नाहीं हें कळून येतें, अशी पद्धत वायव्यप्रांताकडे असल्याचा अनुभव आपणांस आहे. तसें इकडे कां करीत नाहीत? पनवेल तालुक्याच्या लोकांची इतकी ओरड चालली असून सरकारी अधिकारी आपली चूक कबूल करीत नाहींत; उलट वर्तमानपत्रांतून आपलें वर्तनच ठीक आहे, असें लिहु लागले आहेत; हें त्यांचें करणें रास्त नसून सरकारच्या डोळ्यांत धूळ घालण्यासारखें आहे. इ० इ०"

संगतीचें फल— येवलें येथें रामादिन नांवाच्या एका हिंदूनें एका मुसलमानाच्या संगानें मरतां मरतां मुसलमानी धर्म घेतला असें समजतें हिंदु लोक मुक्तीकरितां सन्यास घेत असतात, हा बेटा मुसलमान झाला!

स० शो०


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीं काचेचें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ज्यास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच [illegible] मुळीच स्वस्त विकत नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

Annual in arrears 7 ,,
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 10 JUNE 1895 NO 22

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १० माहे जून सन १८९५ इ० अंक २२

'SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji— Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ साल च्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळलीं पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

---

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) नेमक्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम आमचाय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेलें किंमत ०।०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

---

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ट वद्य ३ शके १८१७

# झांशीची राणी.

## महाराणी लक्ष्मी बाईसाहेब.

लें कां असें पात्र महागुणाचें
तें निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें !

वामन पंडित.

ग्रंथकारः— दत्तात्रय बळवंत पारसनीस, महाराष्ट्र कोकिळाचे एडिटर, सातारा, किंमत रुपये २॥

१ सरासरी २५।३० वर्षांमागील स्थितीचें निरिक्षण केलें असतां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, त्या काळीं पुढें सरसावलेल्या लोकांचे ग्रह स्वदेशेतिहासाविषयीं प्रतिकूळ असून ह्या महत्वाच्या विषयासंबंधीं त्यांनीं बरीच अनास्था दर्शविली. साक्रेटिस, वाशींगटन, सिकंदर, पिटर इत्यादि पाश्चिमात्य महात्म्यांच्या गुणालंकारास त्या त्या वेळच्या विद्वानांची वाणावधू लुब्ध होऊन अत्यंत आसक्त झाल्यामुळें तिची वृत्ति तदाकार झाली आणि स्ववर्गीयांविषयीं अनभिरुचि उत्पन्न होऊन त्यांच्या ठिकाणीं ती विरक्त झाली. प्रथम उंची हिन्याचा मस्त सुवास मस्तकांत जाऊन बसला असतां गुलाब, केवडा, चंदन इत्यादि अन्य अत्तरांचा प्रकृतिमधुर परिमळ असून तो येईनासा होतो तद्वत आमच्या मागील पिढींतील विद्वानांची गत झाली. नीतिमत्ता, धैर्य, औदार्य, शौर्य, शहाणपणा, विद्या आदिकरून आदरणीय सद्गुणांचा निधि पश्चिमेकडे आहे, पूर्वेस याचा मागमुस ही सांपडावयाचा नाहीं, असा विचार त्यांच्या मनांत बाणला गेल्यामुळें आपल्या गांठीं काय आहे हें अवलोकन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली नाहीं. याचा प्रथम परिणाम असा झाला कीं आपल्या मागें होऊन गेलेल्या कर्तृत्वशक्तिवान नरशार्दूलां विषयीं त्यांची पूज्यबुद्धि कमी झाली; पूज्यबुद्धि कमी झाल्यानें त्याविषयीं अनादर वाटूं लागला आणि त्या अनादराचें पर्यवसान तिरस्कारांत झालें. "तुकाराम ढोंगी होता; तो मूर्तिपूजक होता अतएव अनादरणीय होता; परंतु मराठी भाषेत 'कवि' ह्या पदवीस कोणीच पात्र नसल्यानें ह्याच्या अभंगांतील वेचे वेचें माग पडले तेव्हां "ध्यावे, विठ्ठलाचे पाय" या मूळ अभंग पदा ऐवजी "ध्यावे देवाजीचे पाय" असा व इतर असेच अन्य फेरफार सर्व चातुर्य खर्च करून करावे लागले तेव्हां कोठें त अभंग पुस्तकांत घेण्यासारखे सोंवळे झाले! शिवाजी चोर होता; शिवाजी लुटारू होता; तो विश्वासघातकी होता; तो बंडवाला होता. भव्य व अत्यंत विस्तीर्ण असा मोंगल बादशाही-रूपी तरु जीर्ण होऊन निस्त्राण झाला अशा वेळीं त्याचें उन्मूलन करण्यांत शिवाजीनें मोठासा पुरुषार्थ केला असें नाहीं! नाना फडनीस हा मुत्सद्दी पदवीस मुळीच योग्य नव्हता 'गावंढ्या गांवांत गाढवी सवाशीण' ह्या न्यायानें दरबारांतील लोकांवर याची छाप बसली होती म्हणून त्याला कांहीं मुत्सद्दी म्हणतां येणार नाहीं! त्या काळीं अ. सलेल्या युरोप देशीय मुत्सद्यांशीं त्याची तुलना केली असतां नाना त्यांच्या 'पासंगास' देखील पुरणार नाहीं! पाश्चिमात्य धर्म चांगला. पाश्चिमात्य भाषा चांगली. पाश्चिमात्य रीत भात चांगली. सारांश पाश्चिमात्य लोकांचें सर्वच कांहीं चांगलें! अशी मागील पिढींतील लोकांची भावना असल्याचें कळून येतें. वरील विचार वांचून एखाद्यास वाटेल कीं, हे कोणतरी स्वभावस्पर्धेत वरळणाराचे अथवा माथे फिरूचे विचार असावेत. अशा मागील पिढींतील लोकांस विद्वान न म्हणतां "मूर्ख शिरोमणी" ही पदवी समर्पण करणें विशेष शोभेल; परंतु असा ग्रह होण्यापूर्वीं एका गोष्टीकडे अगदीं दुर्लक्ष केलें जातें आणि म्हणून मागील पिढीतील विद्वानाविषयीं हें झालेलें मत असावें तितकें शुद्ध असूं शकत नाहीं. ती गोष्ट ही कीं, तो काळ, तेव्हांची परिस्थिति, हल्लीं सुलभ झालेल्या साधनांचा त्यावेळीं अभाव अथवा दुर्लभता हें लक्षांत आणून त्यांच्या विचाराविषयीं जितकी अनुकंपा दाखविली पाहिजे तितकी ती विकारवशतेनें दाखविण्याचें होत नाहीं.

२ प्रस्तुतकाळीं वर्णाच जीर्ण गोष्टींचा जीर्णोद्धार होत आहे कसरीच्या भक्षस्थानीं पडलेल्या दुर्मिळ बखरींचा 'काव्येतिहासानें' उद्धार करून देशी इतिहासांत फार महत्वाची भर घातली आहे. अनेक दुष्प्राप्य ग्रंथ आता सुलभ झाले आहेत. स्वदेश, स्वभाषा इत्यादि स्वपूर्व शब्दाविषयीं अभिमान वाटूं लागला आहे. अशी अभिनंदनीय स्थिति असतांही पूर्वीच्या कांहीं विस्मरणीय लोकांविषयीं आमचे ग्रह किती चुकीचे असून भ्रांतिमूलक होते याचा विचार केला असतां पूर्व पिढींतील विद्वानास नांवें ठेवण्यास कांहीं जागा राहणार नाहीं. प्रस्तुत टीकाविषयक पुस्तक आमच्या अवलोकनांत येण्यापूर्वीं लक्ष्मीबाई साहेब यांच्या संबधानें आमचे काय ग्रह होते त्याचा येथें उल्लेख उदाहरणार्थ करूं.— बाईसाहेबांचें वर्तन शुद्ध नव्हतें, ती बंडवाली होती, झांशी येथें इंग्लिश पुरुषच नव्हेत पण त्यांच्या अनाथ झालेल्या कोमल बायकामुलें, यांची जी अमानुष भयंकर कत्तल झाली ती राणी साहेबांनीं केली, म्हणून ती महाघोर कृत्या होऊन गेली; झांशी येथील बंडांत तिच प्रधान अंग होते, इंग्रज सरकारानीं झांशी बंडवाल्या पासून बाहुबळानें परत घेतली तेव्हां तिनें पलायन केलें म्हणून ती भ्याड होती आणि कृतोपकारास न स्मरून ती इंग्रजा विरुद्ध उठली म्हणून कृतघ्न होती; पण ह्या आतां पर्यंत असलेल्या ग्रहांपैकीं कांहीं इतके शून्याधार आहेत कीं ते तसे कां झाले हें सांगतां येणें कठिण आहे व कांहींच्या सत्यते बद्दल पूर्वीं जो निश्चयात्मक निर्णय झाला होता त्या विषयीं आतां मन बरेंच साशंक झालें आहे.

३ सार्वभौम सत्ता इंग्रजांच्या हातीं गेल्या पासून ७० वर्षांत आपल्या आचार विचारांत व ज्ञानांत जी उत्क्रान्ति झाली आहे तिकडे लक्षपूर्वक पाहिलें असतां दिसून येतें कीं आंदोलकाची एके बाजूकडील गति पुरी झाली असतां जशी दुसऱ्या बाजुकडे त्याची गमनक्रिया सुरू होते त्याप्रमाणेंच आमच्या समाजाचेंही एका बाजूकडील आंदोलन पुरें होऊन दुसऱ्या बाजूकडील आंदोलन सुरूं झालें आहे. पहिल्या आंदोलनाचे वेळीं समाजावर काय परिणाम झाला याचें वर (कलम १ मध्यें) वर्णन केलेंच आहे. हल्लीं दुसरें आंदोलन अगदीं प्रथम दिशेविरुद्ध चालूं आहे म्हणजे "आपलें तितकें वाईट दुसऱ्याचें तें सर्व चांगलें" ही वेळ निघून जाऊन आमचे वेद म्हणजे अप्रतिम! आमच्या प्राचीन पूर्वजांनीं लाविलेले शोध अगदीं सत्य; आमच्या प्रमाणें शूर होऊन गेले नाहींत; हल्लीं युरोपियन राष्ट्रांत अवगत असलेल्या सर्व कला व विद्या आमच्या प्राचीन ग्रंथांत पूर्णपणें विकासित झालेल्या आहेत. आह्मी ज्यांचें अनुकरण करावें असे सद्गुण इतरत्र आढळावयाचे नाहींत" आमची समाजरचना चांगली. आमचा जाति भेद चांगला. नाना फडणीस याचें अंगीं मुळींच दुर्गुण नव्हते व राज्यकारभारांत त्याच्या चुका झाल्या नाहींत. माहाराणी लक्ष्मी बाई साहेब यांची प्रत्येक कृति मंडणीय आहे इतकेंच नाहीं तर अभिमान भरांत सांपडून सत्यापलाप करण्यास देखील देशभक्त तयार झाले आहेत! अशा रीतीनें समाज-आंदोलकाचें आंदोलन या दिशेनें होत असून ते किती लांबवर जाऊन पोहोंचेल याचें अनुमान करणें आजला दुर्घट झालें आहे.

४ वर निर्दिष्ट केल्या प्रमाणें समाजाचें दुसरें आंदोलन चालूं असतां जे कित्येक सुपरिणाम झाले आहेत त्यांपैकीं ही गोष्ट अभिनंदनीय आहे कीं, यापसून प्रत्येक विचारी पुरुषाची दृष्टि आपला देश, धर्म, भाषा, संस्था यांकडे लागून समाजाला एक प्रकारचें

चैतन्य आलें आहे, आणि इतिहासांत प्रसिद्ध होऊन गेलेल्या लोकांची मिळेल तितकी माहिती मिळविण्याच्या कामीं विद्वान लोकांचें लक्ष लागून पेशवे, होळकर, शिंदे, पटवर्धन गोखले, फडणीस, झांशीची राणी हीं पुस्तकें लोकांपुढें येऊन त्या त्या महात्म्या संबंधी वृत्तांत देऊन आपलें मन संस्कृत करित आहेत.

५ हे विचार आमच्या मनांत येण्यास झांशीची राणी लक्ष्मी बाईसाहेब यांचें चरित्र कारणीभूत झालें. ह्या चरित्राचें बाह्यांग जितकें सुबक आहे तितकेंच अंतरंगही त्यास साजेलसें आहे. पुस्तकाची भाषा शुद्ध, सरळ आलंकृत, उदात्त व प्रसादगुणयुक्त असल्यामुळे तिच्या अंगीं चित्ताकर्षकता फार भरली आहे. चरित्रकाराची वर्णन शैली मनोहर आहे. ज्या ज्या प्रसंगाचें वर्णन चरित्रांत केलें आहे ते वाचीत असतां वाचकाची वृत्ति तल्लीन होऊन जणों काय ते डोळ्यासमोर घडत आहेत असें वाटतें. चरित्रांतील मुख्य रस वीर, करुण व शोक हे आहेत. ह्या रसांस परिपोषक असे योग्य व प्रसंग भाषासरणी असल्यामुळें हें चरित्र कल्पित कादंबरीप्रमाणें मनोरंजक झालें आहे. विषयोपक्रम सुरेख व संगतवार आहे. वरील गुणांनीं युक्त असल्यामुळें हें चरित्र वाचण्यास एकदां आरंभ केला असतां तें संपविल्या शिवाय मनाला चैन पडत नाहीं. पारसनीसारखा 'यशोगीत' गाणारा संगीताचार्य आणि अलौकिक क्षात्र तेजोयशानें सर्व आर्यावर्तास जिनें एकदां धवलीभूत केलें होतें अशी महाराणी लक्ष्मी बाईसाहेब ही चरित्रनायिका हा दुग्ध घडून येण्याचा सुयोग जमून आल्यानें आधींच सोन्याचें त्यांत जडावाचें ह्या कवि वचनाचें स्मरण झाल्या शिवाय कोणास बरें राहवेल !

६ लक्ष्मी बाईसाहेबांचें संकलित चरित्र होईल तितकें करून चरित्रकाराच्या शब्दांनींच देऊन चरित्रांतील रम्य स्थलांचे कांहीं उतारे वाचकांसमोर ठेवावे असा आमचा प्रथम मानस होता; परंतु चरित्र ग्रंथ ४०० पानांचा असल्यानें त्याचें कितीही संकलन केलें तरी तें बरेंच लांबेल आणि प्रत्येक २-४ पानाआड अशीं अनेक रमणीय स्थलें असल्यानें त्यांचा नुसतां नामनिर्देश करणेंही बरेंच वाढून तें कंटाळवाणें होईल असें जाणूनें पाहिला बेत सोडून द्यावा लागला आणि रमणीय स्थलें दर्शविण्याचें कामही संपुष्टांत द्यावें लागलें. हिरव्यागार पल्लवाच्या वेष्टणांत मंद वायूनें आंदोलित होणारें शुभ्र पुष्प वेलीवरून खुडलें असतां त्याची पहिली रमणीयता पुष्कळ कमी होऊन तें चोळवटून जातें तद्वत ह्या चरित्रांतून उतारे घेतले असतां त्यांची मूळ शोभा कमी होणारी आहे या कारणा करितां हें चरित्र वाचून मनांत उद्भूत होणारे विचार आणि आपच्या दृष्टीनें दिसणारीं कांहीं दोषस्थलें मात्र येथें दाखल केलीं आहेत. शिवाय कोणत्याही पुस्तकावर विस्तृत टीका देण्याचें वर्तमानपत्रें हें योग्य स्थल नाहीं असें आह्मास वाटतें.

( पुढें चालेल )

---

नामदार दादाभाई नवरोजी यांनीं सिव्हील सरव्हीस परीक्षे विषयींचा प्रश्न पुन्हा पार्लमेंटांत काढिला आहे. त्यांची सूचना दर आठवड्यास आह्मी लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करित असतों. ही सूचना बहुत लोकांच्या पाहण्यांत आली असेल अशी आमची समजूत आहे. सूचनेचा विषय जुना आहे तथापि त्याचें महत्त्व फार मोठें आहे; आणि तिचा अव्हेर झाल्यामुळेंच भावी राजपद्धतीचा पाया या सूचनेच्याच निकालावर येऊन बसला आहे. ही सूचना पसार झाली ह्मणजे उदार तत्वें राजनीतींत कायम राहून राज्यकर्त्यांचा सर्वत्र लौकिक होईल. ही सूचना अगदीं आणिबाणीची आहे. तिच्या जयापजयावर आपल्या राजकीय चळवळीची इमारत उभारावयाची आहे. एकाच कालीं इंग्लंडांत व इंडियांत सिव्हील सरव्हिस परीक्षा होत गेली ह्मणजे आपल्या हक्कांचा किल्ला सर केला असें होणार आहे. आह्मास जें पहिलें अश्वासनपत्र मिळालें आहे त्याच्या आधारें आह्मी हल्लीं भांडत आहों.

प्रस्तुतच्या नियमा प्रमाणें सिव्हील सरव्हिसचा गोऱ्या अधिकाऱ्यांस मक्ताच दिल्या सारखें आहे. चुकून मधून एखादा नेटीव सिव्हील सरव्हंट होतो परंतु तितक्यानें आमची समजूत पडत नाहीं. परीक्षेच्या कसोटीला लाविल्या नंतर जाति, धर्म, व देश इत्यादिकांतला भिन्नपणा बाधक होत नाहीं खरा परंतु सिव्हील सरव्हिसच्या परीक्षेला योग्य उमेदवार ठरण्यापूर्वीं पुष्कळ लचांडें व अडचणी नेटिवांच्या मागें लावून ठेविल्या आहेत. विलायतेंत वास्तव्य, वयाचें मान, परकी भाषांचा कठिण अभ्यास इत्यादि गोष्टी सोप्या नाहींत. धनाचें, विद्येचें, व शरीराचें भक्कम सामर्थ्य लागतें.

विनाकारण अडचणी आहेत त्या दूर कराव्यात अशा विषयीं मूळ सूचना आहे. इंग्लिश राज्यपद्धति व चालीरीती कळण्यासाठीं विलायतेंत कांहीं वर्षेपर्यंत वास्तव्य अगत्याचें आहे तर इंडियांत राज्यकारभार चालविता येण्यासाठीं वास्तव्य कांहीं मुदतीपर्यंत इंडियांत झालेंच पाहिजे अशी अट गोऱ्या अधिकाऱ्यांस नको काय?

नामदार दादाभाई यांचा भगिरथ प्रयत्न चालूं आहे. विलायतचें लोकमत आपल्यास अनुकूळ करून घेण्या साठीं त्यांचा उद्योग चालूंच आहे. नामदार दादाभाईंचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. ते स्मरून आपण त्यांच्या प्रयत्नाचें योग्य चीज करण्यास शिकलें पाहिजे. कृतज्ञता मनांत चांगली बाणली पाहिजे आणि त्या शिवाय त्यांच्या प्रयत्नास यश येईल अशा रितीनें आपण त्यांच्या वटा झाडून दिल्या पाहिजेत. आपल्या कर्तव्याला आपण अगदींच विसरलों. आज पर्यंत सुमारें बाहेरून पंचवीस तीस अर्ज कामन्स सभेस गेले आणि त्या अर्जावर सरासरीनें वीस हजार लोकांच्या सह्या झाल्या आहेत. पण वऱ्हाड प्रांत या चळवळी संबंधानें अगदीं चैतन्यशून्य दिसतो. याच प्रकारची सूचना नामदार पाल साहेबांची होती तेव्हां मोडकी तुटकी एक सभा आकोल्यास भरली होती. आणि सभेचा फार्स होण्या पलिकडे कांहीं विशेष गोष्ट घडल्याचें आह्मास ठाऊक नाहीं. ती वेळ गेली तरी आतां पुन्हा योग आला आहे. आपची प्रांतस्थ मंडळी आपली उदासिनता टाकून कामन्स सभेस एक अर्ज धाडण्याची खटपट करितील असें आह्मी इच्छितों.

वऱ्हाडचें पाऊल राजकीय गोष्टींत इतर प्रांताबरोबर आहे इतकेंच नाहीं तर वऱ्हाडचे दोन मुत्सद्दी विलायतेंत राष्ट्रीय सभेची वकिली करण्यासाठीं देखील गेले होते असें आह्मी गर्वोक्तीनें ह्मणत असतों. पण असल्या वीरांचा व त्यांच्या सारख्या प्रबुद्ध पुढाऱ्यांचा पूर्वीं प्रमाणें पुढील प्रताप दिसत नाहीं. सोंगें बहुत आणितात परंतु वाखणण्या सारखी बतावणी एकाचीही नाहीं. आह्मी उमेद बाळगतों कीं आमचे पुढारी ह्मणविणारे गृहस्थ निदान या समयास जाहिरसभा भरवून पार्लमेंटास अर्ज धाडून कृतकृत्य होतील तर बरें! सिव्हील सरव्हिस परीक्षा एककालीं दोन स्थळीं होण्या विषयीं द्विधामत कोठेंच नाहीं। पण व्यवस्थितपणें चाललेल्या सार्वजनिक संस्था नसल्यामुळें अर्ज होण्यास मोठा विलंब लागतो. पण सद्यां स्वस्थ बसण्याची वेळ नाहीं. सर्वांनीं एकत्र जमावें आणि एक अर्ज पार्लमेंटास धाडावा. हेंच आपलें पहिलें कर्तव्य होय.

---

वऱ्हाडांत वकीलमंडळ बरेंच मोठें आहे. आज मितीला ११८ वकील आहेत. कांहीं जुने मराठी वकील आहेत. बाकी सर्व इंग्रजीच आहेत. या प्रांताचा विस्तार, लोकसंख्या व लोकस्थिती या मानानें पाहतां वकील मंडळी पुष्कळ आहे. इकडे वकिलीचें उत्पन्नही चांगलें होतें त्यामुळें या धंद्यांत ल्या पुष्कळ लोकांची ओढ इकडे विशेष आहे. उत्पन्नाचें मान मोठें असण्याला कारण असें कीं लोक अडाणी, अक्षरशत्रु व खाऊन पिऊन मध्यम असल्यामुळें जितखोर विशेष आहेत.

वकिलांच्या मानानें पाहतां न्यायाधीश मंडळी फार फिकी पडते. कायद्याचा अभ्यास करून वकिलीची, मुनसफीची किंवा एल. एल. बीची परिक्षा दिली आणि तींत पास नापास होऊन नंतर न्यायाधीश झाले असे अधिकारी आमच्या प्रांतीं दुर्मिळ व विरळ आहेत. बहुतकरून नियम असा आढळतो कीं कोणाला तरी अधिकारी बनवावयाचें आणि नंतर त्याला न्यायाचीं कामें करितां यावीं ह्मणून लोअर हायर परिक्षा देण्यास भाग करावें. सज्ञान, व परीक्षा उतरून नाणवलेले कायदेपंडित मिळत असतांना देखील या प्रांतीं अज्ञानी, अनभ्यस्त, व कायद्या विषयीं आंधळे असे अधिकारी नेमिले जातात आणि नंतर त्यांच्या योग्यतेचीं शिक्का मोर्तबें हायर लोअरच्या परीक्षेच्या निकाला प्रमाणें देण्यांत देतात. हायर लोअर परीक्षा ह्मणजे आह्मास तर पोरखेळा प्रमाणें वाटतें. कशी तरी परिक्षेची ऐट व खिळाटोपी आणलेली असते

मुंबई इलाख्यांत न्यायखातें फार उत्तम आहे आणि त्यांतल्या त्यांत सबार्डिनेट जज्जची संस्था अत्यंत वाखाणण्या सारखी आहे. या मुनसफमंडळीचे निकाल बहुत करून हायकोर्टांत कायम रहात असतात. वऱ्हाडांत न्यायाधीशानें निकाल दिला ह्मणजे न्याय मिळाला असें मानावें लागतें. न्यायाची पारख कायद्याच्या कसोटी बरहुकूम झाली असें हायकोर्टांत गेलें तरी खात्री लायक वाटत नाहीं.

वऱ्हाडांतील न्यायखात्यांत मुख्य सुधारणा न्यायाधीशा संबंधानें झाल्या पाहिजेत. जुने लोक आहेत ते अनुभवानें आतां काम उत्तम प्रकारें चालवितात. पण नवीन नेमणुका करिते वेळीं तरी वकिलीच्या धंद्यांत प्रवीण झालेल्या लोकांस जागा देत जाव्या एवढीच आमची सूचना आहे.

---

बाबू डब्ल्यू सी. बानरजी हे पक्के राष्ट्रभक्त असल्याविषयीं सर्वत्र ख्याति आहे. हल्लीं इंग्लंडांत आपला पक्ष चांगला बळावत आहे तो इतका कीं हे बाबू गृहस्थ विलायतेस राहण्यास गेल्या नंतर क्रायडनच्या लिबरल लोकांनीं त्यांच्या तर्फे पार्लमेंटांत सभासद होण्याविषयी विनंती केली. हा योग मोठा उत्तम होता पण प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें बाबू बानरजी यांस होय ह्मणून रुकार देता आला नाहीं. शिवाय हल्लींचें प्रधानमंडळ मोडून पुन्हा नवी निवडानिवड लवकर होईल असा रंग दिसतो. तेव्हां क्रायडन साठीं लिबरल उमेदवार ह्मणून बाबू बानरजी यांस पुढें येतां आलें नाहीं तरी हरकत नाहीं. पण इतकें खरें कीं नामदार दादाभाई नवरोजी यांच्या निवडणुकीनें पार्लमेंटचा दरवाजा आपल्या लोकांस खुला झाला आणि कालान्तरानें आपल्यांतील बरेच लोक पार्लमेंटांत सभासद होण्याचीं आगामि सुलक्षणें दिसत आहेत.

---

भरतपूरच्या महाराजांस अकस्मात् पदच्युत केल्यामुळें देशभर सर्व लोकांस मोठी हळहळ वाटली. विलायतेंत या प्रकरणाचा कांहीं तरी विचार होईल अशी थोडी बहुत आशा होती पण मि. सिमीरकी यांस नामदार फोलर यांनीं जबाब दिला कीं भरतपुरचे महाराज राज्य चालविण्यास नालायक आहेत ह्मणून त्यांस गादीवरून दूर केलें आणि या करण्यास माझी संमती आहे. या उत्तरानें आमचा आशातंतु अगदीं विलयास गेला. प्रश्न एवढाच कीं भरतपुरचें राज्य हातीं घेऊन वर्षाचा काल लोटत नाहीं तोंच महाराज नालायक कसे ठरले! खरोखर, राजेरजवाडे ह्मणजे चित्रांतल्या बाहुल्या प्रमाणें आहेत; किंबहुना त्यांच्या पेक्षां त्यांची स्थिती वाईट आहे. बाहुली कळ फिरविल्या प्रमाणें फिरते परंतु अचेतन राजे नसल्यामुळें त्यांच्या चेतना देखील त्यांस बाधक होतात!

---

मुंबई इलाख्याची प्रांतिक राष्ट्रीय सभा बेळगांवास भरल्याचें सर्वश्रुत आहे. ही सभा राजकीय होती पण तिच्या जोडीला प्रांतिक सामाजिक सभा भरावयाला पाहिजे होती अशा विषयीं त्या सभेचे अध्यक्ष मि॰ दिनशा एदलजी वाचा यांनीं उत्तम प्रकारें प्रतिपादन केलें आहे आणि बहुत करून सालोसाल प्रांतिक राजकीय सभा आटोपल्या नंतर सामाजिक सभाही भरत जाईल असा सुयोग दिसतो. बड्या राष्ट्रीय सभेच्या मागून जशी सामाजिक सभा भरत असते तशी व्यवस्था प्रांतिक सभे संबंधानें होत आहे हा मोठा लाभ होय. बेळगांवच्या सभेंत ही एक उत्तम गोष्ट घडली. सामाजिक उन्नति व राजकीय उन्नति हीं जुळीं भावंडें आहेत तेव्हां त्यांचें एकत्र वास्तव्य होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. एका उन्नती वाचून दुसरी उन्नतीच नाहीं. त्यांचा परस्पर संबंध असाच निकट आहे तेव्हां तो कायम व चिरायू राहील अ-

शा विषयीं झटलेंच पाहिजे.

यंदा राष्ट्रीय सभेची बैठक पुण्यास असून तयारी उत्कृष्ट प्रकारें व पद्धतवार चालली आहे परंतु अलिकडे अशी एक अफवा उठली आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक सभा भरविणें असल्यास कांहीं लोक राष्ट्रीय सभेंतून अंग काढण्यास इच्छितात. कांहीं वर्षांपासून पुण्यास असला वाद चालूं आहे पण तो अगदीं अदूरदृष्टीचा, अनुदारपणाचा, आत्मघातक आहे असा बहुतेक राष्ट्रभक्तांचा पक्का ग्रह झाला आहे आणि तेच आह्मांस योग्य वाटतो. तेव्हां पुण्याची अफवा खोटी ठरो किंवा खरी असल्यास ती निरर्थक व निष्फळ होवो असें आह्मी इच्छितों.

## 'मिस्टर' ला फांटा

अलिकडे रेसिडेन्सी आरडरीमध्यें चांगल्या चांगल्या हुद्देदारांच्या मागें मिस्टर हो उपसंज्ञा देखील लिहित नाहींत हें लाजिरवाणें होय. अशा प्रकारची चूक वडली तरी ती चांगलें वळण लावण्यासाठीं शिक्षेस पात्र आहे आणि मग जर बुद्धिपुरस्सर ही गोष्ट घडली असली तर रेसिडेन्सी आरडरमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या नेमणुकांच्या लेखकावर व प्रकाशकावर बेअब्रूची फिर्याद कां करूं नये हें आह्मांस कळत नाहीं. उदाहरणार्थ, विठूजी नारायण व लक्ष्मण नारायण गोखले हे उभयता तहशिलदार आहेत पण त्यांच्या बदल्या लिहितांना त्यांच्या मागें मिस्टरचा उपसर्ग देखील नाहीं. पण याहून नवलाची गोष्ट ही कीं आमचे व्यवसायबंधु प्रमोदसिंधुकर्ते व शुद्धवऱ्हाडीकर्ते विठूजी नारायण यांचा नामनिर्देश साध्या 'राजमान्य राजश्री' ला फांटा देऊन करितात. आह्मास उमेद आहे कीं ते आपली नजरचूक कबूल करितील आणि सरकारच्या चुकीबद्दल आपल्या पत्रांतून विचारपुस करितील.

## नवा दवाखाना

आमचे मित्र राजश्री दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर यांनीं आकोल्यास खानगी दवाखाना घातला आहे. डाक्टर कोल्हटकर यांचें विद्यार्जन वऱ्हाडांतील हायस्कुलांत व मुंबईच्या मेडिकल कालेजांत झालें आहे. यांचें तीर्थरूप रा. रा. कृष्णाजी हरी उर्फ दाजीसाहेब हे सुप्रसिद्ध आहेत. यांचा अभ्यास संपूर्ण झाला आहे. फक्त एल एम ॲन्ड एस ही पदवी मिळण्यासाठीं पुन्हा ते यंदा परिक्षेस जातील तेव्हां अवशिष्ट भाग पूर्णतेस पोंचला असें होईल. हल्ली गेला आणि रेपूट साहेबांचा असाच प्रकार त्यांच्या अभ्यासाचा झाला आहे. तथापि अभ्यास संभाळून त्यांनीं स्वतंत्र दवाखाना काढिला हें कल्पनाला ठीक आहे. वैद्यकीचें अध्ययन इंग्रजी रितीप्रमाणें झालें असून शिवाय नेटिव वैद्यकाचा यांस भारी नाद आहे. औषधपाणी देण्याचा पारिपाठ याचा दोन अहीच वर्षांचा आहे आणि यांच्या हस्तक्रियेनें पुष्कळ रोगी बरे झाले आहेत. वैद्य अध्ययनशील, मेहनती, चिकित्सक, निर्लोभी व विश्वासुक असावा लागतो तसे हे गृहस्थ आहेत हें आह्मी अनुभवावरून सांगतों.

एल. एम. ॲंड एस. या पदवीची वस्त्रे परिधान करी पावेतों यांच्या नव्या धंद्याचा जमही येथें चांगला बसेल आणि हे आपल्या शुद्ध आचरणानें, गोड स्वभावानें व वैद्यक्रियेंतील नैपुण्यानें उत्तरोत्तर लोकप्रिय व कीर्तिवान होत जातील असें आह्मी त्यांच्या गतचरित्रा वरून भाकित करितों. यानंतर तें खरें करून दाखविणें डा० दत्तोपंत यांच्या हातीं आहे.

## The Berar Samachar

MONDAY JUNE,

10, 1895

The events of the last fifty years open a new page in the history of India. These events have so far moulded national affairs that we have developed a new national existence. This history is one consistent record of the best aspects of a foreign rule. It narrates a tale full of proud and glorious traditions of the British Government. The history of the British Raj re-recalls to our mind the like history of the Roman Empire when the great statesmen of that ancient republic *romanised* the neighbouring countries of France and England. This ancient illustration presents both the sides of a picture which the best advantages and the worst disadvantages of a foreign rule may present to our view. The English rule in India has not yet drawn in full colors the bright side of its administration and if God wills it, we shall have no other side to behold and shall help to enlarge magnificent by the size of the pictura under public gaze. We must confess that the rise of India is due to the advent of the English sovereignty. Out of the decaying materials of an ancient nation England built anew the present Indian Empire. It is a vast nationality that commands admiration and respect for the goodness of Her Majesty's rule, and opens as well a resourceful battery to eclipse with its dazzling lightning the other nationalities on the face of the earth. So much is in store for the further prospects of the British administration.

But we have now approached a most critical period in the history of our nation. A new phase of national life we have begun to enter. In this transition our rulers will have to fix upon one of two ways. Upon their decision will rest the future of India. The present stage in our onward march is most critical. The position affords two alternatives. The first will raise this nation to the highest pinnacle of material and political prosperity. The other will blot us out from the hall of freedom and liberty and we shall be reduced to the thraldom of slaves. The crisis requires a decisive measure. No footing will be less slippery and dangerous than that of the half—hearted treatment of a step—mother which England extends towards India. Let us see what alternative remedy England adopts.

A deep—rooted policy of repression and retrogression is current. It signalizes the gravest and most alarming situation of India. A salutary check must be placed on this policy. The conflict between Anglo—Indian and Indo—English interests is gradually becoming intense and absorbing. The danger must be averted and the only solution of the problem lies in the true Imperial poleicy, which Major Evans Bell has so eloquently and admirably written. The book is most valuable because an English—man of deep insight, long experience and statesman like forecast has laid down the future policy of India. With this meagre reference to the book we stop here with a hope to do it full justice in our next issues.

At the Provincial Conference at Belgaum the President Mr. D. E. Wacha dealt with a number of subjects of which the present fiinancial condi—tion of India occupied a prominent place. The address was able and based on stern facts. If finances of a state constitute what a State is we would like to attract our ruler's attention to the para which significantly proves that a costly Government is the very evil at the root. Is it not so in India Mr. Wacha observes:—

"To what then may we attribute the causes of the chronic deficit? I shall tell it in a word. To *Policy*. It is superlfluous for me to inform you what political economists, and practical politicians and statesmen have over and over remarked, that the expenditure of a country depends on policy pursued by its Government in the conduct of its administration. This is a trite State maxim. Speaking about India Bright observed in the same speech to which I have already referred: "It is the policy that has been pursued there which renders the revenue liable to this constantly recurring deficit." Economists tell us that a sound policy is the first condition of productive labour and of the saving that creates capital. It is therefore highly essential for a State which is not an absolute despotism to carefully examine what influence its policy has on the economic progress of the people. It has to be ruefully acknowledged that it is the mischievous policy of the Indian Government which is at the root of the present financial distress. It is a policy directly opposed to that which stimulates productive labour, accumulates wealth, and enables the people to better endure the burdens of growing taxation.'

Sir Charles Dilke holds very independent views of the Indian politics. His opinions were elicited at an interview and appeared in the columns of 'India.' His words are memorable and afford a noteworthy lesson to one who would seriously think of reforming the highly centralized system of the British administration. Many of the originally constituted Councils have become quite useless and Sir Charles does not shrink from boldly questioning their utility. He lends his unmistakable and sanc—tioning approval to the National Congress.

Sir Charles's opinion was ex—pressed as follows: "The Congress is the inevitable result of the seed we ourselves have sown. It is true the Congress is not thoroughly representative, but it is representative as present circumstances will allow. The fact of its not being thoroughly representative ought not to blind us to the reasonableness, the wisdom of many of the Congress demands. British rule can only be strengthened by widening its base." The Hindu of Madras remarks thereupon to the following effect: Of course these sentiments would be gall and wormwood to our Anglo Indian friends who have come to dislike educated Indians to such an extent that any movement started by them or in their interest is vehemently and most recklessly opposed. Sir Charles Dilke said a good deal about the economy of a change in the whole system of enlistment for the white army in India and about certain fresh sources of revenue which he thinks are possible. But, he added, to the latter method of improving the Indian financial condition he would prefer trying all the available means of economy.

## वऱ्हाड

हवामान:— उष्मा ११० अंशा पर्यंत वाढला होता व उकाडा मनस्वी होता. पण थोडा थोडा पाऊस पडूं लागून वर्षाकालास आरंभ झाला. किरकोळ दुखणीं चालूंच आहेत.

मि. बुलक जुडिशिअल कमिशनर हे येत्या गुरुवारीं कर्नल स्पान्स्की साहेबांपासून रेव्हिन्यु कमिशनरचे कामाचा चार्ज घेतील आणि जुडिशिअल कमिशनरचे जागीं सुटी संपल्या नंतर मि० आबर्ड साहेब दाखल होतील असें कळतें.

रा. रा. गोविंद नारायण शेवडे, तहशिलदार बाळापूर यांस परत कमिशनर कचेरींत बोलावल्यामुळें ते तिकडे आजारीपणातच गेले. आणि ते पुढें पेन्शनही घेणार आहेत.

रा. रा. रामचंद्र अंबादास अॅक्टिंग तहशिलदार, अकोला यांस नायब तहशिलदारीवर परत पाठविण्यांत येत आहे. बढती देण्याचा व रद्द करण्याचा हा प्रकार फार वाईट होय!

उमरावती डेपुटी एजुकेशन इनस्पेक्टरचे हेड क्लार्क रा. रा भाऊराव यांनीं या महिन्यांत पेनशन घेतलें.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. यांनीं तहशिलदारीची जागा पतकरतों ह्मणून कळविल्या वरून त्यांची लवकरच कोठें तरी नेमणूक होईल हें कळविण्यास आनंद वाटतो.

आणि दुसरी एक तहशिलदारीची जागा रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट बी. ए. एल एल. बी यांस देणार असल्या विषयीं बातमी आहे. तहशिलदारीवर असे विद्वान् गृहस्थ नेमण्यानें रयतेचा व सरकारचा मोठा फायदा होईल. उभयतांच्या वडिलांच्या नोकऱ्या वऱ्हाडांत एकसारख्या असून कमिशनरच्या जागीं झालेल्या आहेत. जुन्या अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांस योग्यते प्रमाणें सरकारी चाकरी देण्याचा जो नियम आहे त्याचा चांगुलपणा वरील नेमणुकांनीं व्यक्त होईल.

उमरावतीस एक स्वदेशी कपड्याचें छोटे खानीं दुकान नमुन्यांत निघालें आहे. अशीं दुकानें सर्वत्र पसरून देशी कापड वापरण्याचा कट झाला पाहिजे ह्मणजे ह्मणण्यासारखी कांहीं चळवळ उडेल.

जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोले म्युनिसिपल कमेटीचे हद्दींतील बारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९५।९६ इसवी सालाबद्दल ता. २ माहे जून सन १८९५ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदहू वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९५

Gopal Hari.
सेक्रेटरी- मुनसिपाल कमिटी
आकोला

## चिंता.

मळा गांजते एक कृत्या प्रमत्त ॥
तिला मृत्यु येवो घडोवा मदंत ॥
तिनें घेतली पाठ माझी कठीण ॥
सुखा पारखा जाहलों मी झणून ॥ १ ॥
कधी जीव माझा उगा राहूं दे ना ॥
मनीं शांति अत्यल्प ही ओगरीना ॥
पडूं दे मनाला न ती चैन कांहीं ॥
तिचें नांव "चिंता." असे डाकिणी ही ॥२॥
मळ्याची कथा आननीं स्पष्ट नाचे ॥
बदावा न ये गात्र काठिण्य वाचें ॥
सदां खिन्न कष्टी दिसे ती उदास ॥
तिचे जाळिती नेत्र वांटे जगास ॥३॥
जियें होय ह्या घातकीचा प्रवेश ॥
तिथें भासती वस्तु साऱ्या उदास ॥
गळे पेत आमंद यतुसान्निधानीं ॥
प्रभा जाय अंभोरुहाची सुकोनी ॥४॥
तिच्या घोर हातीं असे घोर भाला ॥
अशुद्धांत जो न्हात मझ्या जहाला ॥
अशा पाहतां भीषणा आकृतीला ॥
कितीदां तरी घर्म गात्रांस आला ॥५॥
शरीरीं ज्वळवूं लोह वस्त्रास ल्याली ॥
तिनें शक्ति माझी लया सर्व नेली ॥
दिले कष्ट देहास माझ्या अनंत ॥
तिला मृत्यु येवो घडो वा मदंत ॥६॥
मनीं एकदां ये " जुने साधुसंत ॥
" सुमंत्रें महा दुःख मोक्ष होत. "
जुने या मुळें चाळले ग्रंथ भार ॥
परी यत्न ते सर्व झाले असार ॥७॥
वदूं लागलों वेद मी स्वाननानें ॥
" लया ताप जावो " अशा कामनेनें ॥
सुविद्या बळें सिद्ध झालों हराया ॥
महादुःख माझें, परी सर्व वाया ॥ ८ ॥
तिच्या चिंतनीं शेवटीं झोंप येतां ॥
उरीं येउनिया बसे ती प्रमत्ता ॥
किती नेत्र आरक्त! मुद्रा भयाण ॥
जणों खावया धांवली राक्षसीण ॥९॥
रथीचा नभीं सारथी प्राप्त होता ॥
उठे घोर स्वप्नांतुनी मी अशा त्या ॥
उरीशी उठे, ती बसे पृष्ठभागीं, ॥
छळी सर्व काळीं मला ती अभागी ॥१०॥
मदीयाननीं वांकवाकूनि पाहे ॥
करी हास्य विक्राळ वैदासिणी हे ॥
न सोडी मला ती सदां सन्निधानीं ॥
मरावेंच दोघांतुनी एक कोणी ॥११॥
मनीं एकदां ये " विदेशास जावें ॥
" हिच्या दुष्ट जाचांतुनी मुक्त व्हावें" ॥
विदेशास गेलों ह्मणूनी पळून ॥
परी तीहि पाठीस आली निघून ॥१२॥
पुढें सिंधु तोयें जियें भू प्रदेश ॥
जियें किल्मिषें सर्व होतीं अशेष ॥
जियें राहतो विश्व देवेश भोळा ॥
निघालों अशा दूर रामेश्वराला ॥१३॥
रची सेतु श्रीराम तेथें पवित्र ॥
चमत्कार तेथें जहाले विचित्र ॥
अनुष्ठान केलें अशा सुस्थळांत ॥
परी ती तिथें प्राप्त झाली क्षणांत ॥१४॥
पुढें दिव्य गोदातटीं वास केला ॥
जियें वाळवंटा मधूनी खळाळा ॥
सदां वक वाहे जलौघ प्रशांत ॥
सहर्षें वनश्री रमे ज्या स्थळांत ॥१५॥
तटीं वाढली उंच झाडें महान ॥
पडे गर्द छाया असें दाट रान ॥
वसे व्याघ्र जेथें सदांही लपून ॥
अशा घोर रानांत गेलों पळून ॥१६॥
दरी आणि खोऱ्यांत मी वास केला ॥
नसे भोग माझा परी पूर्ण झाला ॥
अशा दुर्गमीं त्या स्थळीं ती शिरून ॥
छळाया मला प्राप्त झाली फिरून ॥१७॥
पुढें जाय तेथूनि हो मी निघून ॥
गिरीला, असे जो हिमें नित्य पूर्ण ॥
किती मेघमाळेस भेदूनि गेलीं ॥
असंख्यात ज्याचीं शिरें अंतराळीं ॥१८॥
धुकें सर्वदा व्याप्त आकाश होतें ॥
न बर्फाविणें अन्य कांहींच तेथें ॥
कडे पहातां धैर्य बाकी उरेना ॥
स्थळीं ही अशा ये कशी ती कळेना ।१९।
पुढें वाटला " हा मनाचा विकल्प ॥
" नसे अर्थ ह्या व्यर्थ भीतींत अल्प" ॥
अशी होय जो भावना मन्मनाची ॥
मला क्षुब्ध हंऊनि ती फार जाची ॥२०॥
मला वाटलें " शक्ति माझ्यांत आहे ॥
" प्रतिष्ठा हिची काय ती बापडी हे " ॥
तिच्याशीं जरी झुंजलों मी अपार ॥
मला प्राप्त झाली अखेरीस हार ॥२१॥
मला वाटलें " एकदां मी भरीला ॥
" पराभूत केलें, रजीं लोळविला " ॥
पळालों पुढें मी सहर्षें तिथून ॥
ह्मणालों "भले! शत्रु गेला मरून" ।२२।
वळूनी जरा पाहिलें पृष्ठ मार्गी ॥
गळालें तदां धैर्य ये घर्म अंगीं ॥
तिला मागुती पाहिलें धांव घेतां ॥
सजीवा कशी जाहली हे ममत्ता ! ॥२३॥
अहो, जीव कंटाळला फार आतां ।
जये मापितां वेदना भोगतों त्या ॥
सहाय्यास मी प्रार्थिला एक वीर ॥
बळानें असे आगळा तो उदार ॥२४॥
दिसंदीस चिंता करी क्षीण देहा ॥
नको ह्या जगीं वास, आतां पुरे हा ॥
कधीना कधींही तरी ती दयानें ॥
अहो जीव घईल कांहीं मिषानें ॥२५॥
मला छिन्न भार्यीच केलें तियेनें ॥
असे, आपल्या तीक्ष्ण शस्त्रावळीनें ॥
मिळे मन्मनाला न कांहीं विसावा ॥
पुरे वांचणें वाटतें मृत्यु यावा ! ॥२६॥
जियें शत्रुचें सर्वगामित्व व्यर्थ ॥
मला त्या स्थळीं न्यावयाला समर्थ ॥
असे मृत्यु हा वीर लोकीं प्रसिद्ध ॥
मला स्वाश्रयीं होय घ्यायास सिद्ध ॥२७॥

BEE.

## वर्तमानसार.

दिवाण रघुनाथराव यांचें ह्मणणें असें कीं हिंदुस्थान देश इंग्रज लोकांनीं जिंकला असें ह्मणतां येत नाहीं. त्यांनीं हिंदुस्थान मिळविला असें मात्र ह्मणतां येईल. ह्मणजे जिंकला आणि मिळविला यांतील भेद दिवाण बहादूर यांनीं दाखविला आहे. जेव्हां इंग्रज लोकांचें आणि हिंदुस्थानांतील लोकांचें सर्व प्रकारचें दळणवळण ह्मणजे लग्नकार्यादि गोष्टी होतील, तेव्हां इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान जिंकला असें ह्मणतां येईल. तोंपर्यंत इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान मिळविला, असें ह्मटलें पाहिजे.

लोहवृष्टी—मिरझापूर येथून जवळच गेल्याच्या मागील आठवड्यांत एकेक शेरापेक्षांही ज्यास्त वजनाच्या लोखंडाच्या तुकड्यांची एकाएकीं वृष्टी झाली. हा चमत्कार कित्येकांनीं प्रत्यक्षही पाहिला असल्याचें समजतें. शास्त्रज्ञ याचें कारण शोधून काढतील काय ? आ. व.

एशिया, यूरोप, अमेरिका व आफ्रिका या चारी खंडांत हल्लीं प्रत्येक बाबतींत लढाई सुरू आहे. राजकीय बाबतींत प्रजेंत अनेक मतांतरें, राष्ट्रांना जास्त प्रदेश मिळविण्याची हाव, व व्यापार वाढावा ह्मणून जो तो देश हापापलेला असून एकमेकाला खालीं पाडण्यास पहात आहे अशी स्थिति, व इत्यादि अनेक प्रकार इतके चमत्कारिक रीतीनें चालले आहेत कीं त्यामुळें राष्ट्रीय शांतता ही कुठेंच आढळत नाहीं.

स्वीडनच्या युवराजानें उत्तर ध्रुवाचा शोध लावला असून, तिकडे तो आपलें राज्यही स्थापणार असें ह्मणतात.

कागद व लांकडें यांचें कापड—जपानच्या कित्येक शिपायांनीं कागदापासून बनविलेल्या कापडाच्या टोप्या वापरण्यास देण्यांत आल्या आहेत. शिवाय म्यांचेस्टर वगैरे प्रांतांत, लांकडांच्या आंतील गराचें कापड बनविण्याचा प्रयत्न पुष्कळ सफळ होत चालला आहे या कापडास पाण्याची भीति नसते. वाटरप्रुफ कापडाप्रमाणें हें कापड स्वाभाविकच बनतें.

श्रीस. वि.

" शेतकरी लोकांस कर्जाच्या बुजबुजाटांत नेहमी कुजत ठेवण्यांत व त्यांची वैर करण्यास सरकारच्या हल्लींच्या महसूल पद्धतीसारखी दुसरी रामबाण युक्ति नाहीं. "

ज्या. सिं.

कोणतीही संस्था प्रचलित होण्यापूर्वीं लोकांचीं मतें, रुचि व सवई यांमध्यें तीस अनुरूप असा फेरफार व्हावा लागतो. तो झाला असतां त्या संस्थेचा स्वीकार करण्याकडे त्यांची अनायासें प्रवृत्ति होते व त्या संस्थेच्या रक्षणासाठीं व ती उत्कृष्ट रीतीनें फलद्रूप होण्यासाठीं त्यांच्या हातून ज्या गोष्टी घडल्या पाहिजेत त्या ते सहज शिकतात इतकेंच नव्हे तर त्या करण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठायीं विशेष चांगली आढळून येते. लोकांच्याठायीं अशा प्रकारच्या अनुकूळ सवई व वृत्ति मुळच्याच आयत्या असल्यास त्याच्या अनुरोधानें लोकनियंत्यांनीं आपले कायदेकानू वगैरे करावे हें योग्य होय. सु. प्र.

पाद्री खात्यांत २०००००० रुपये वर्षास धर्मार्थ खर्च होतो तो हिंदुस्थानच्या तिजोरीवर कां आदळावा हा प्रश्न गेल्या शुक्रवारीं मि. केन यांनीं पार्लमेंटास विचारला होता त्यावेळीं कित्येक सूर्य पुत्रांचीं तोंडें इतकीं लाल झालीं कीं अखेर क्लोरिडा वाटरनें थंड करावीं लागलीं, ह्मणून केन साहेब त्यापैकी नाहींत. त्यांनीं दडपून सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील हिंदु लोक आपला राजहक्क ह्मणून देतात त्याचे ट्रस्टिज इंग्रज आहेत. भर रकम जातीच्या देवळांत उंच सुरावर ख्रिस्ताच्या प्रार्थनाचाल पद्याकडे खर्च करणें ह्मणजे निव्वळ दुरवहा होय.

केरळ पत्रकारानें खालील बातमी दिली कीं, ख्रिस्तधर्मी लोकांनीं येथील दोघां पोरींस आपल्या नादास लाऊन पळविण्याचा विचार केला. इतक्यांत त्या पोरीच्या नातलगांनीं ख्रिस्तभक्तावर हल्ला करून पोरीची सुटका करून घेतली; पण माजिस्त्रेटानें पोरीच्या नातलगास कैदेंत ठेवलें आहे. उलट्या चोराच्या बोंबा त्या ह्या ! ! म० मि०

" खरोखर, प्रपंच हा एक विलक्षण चमत्कार आहे. हा डोंबाऱ्याच्या झोंपडीपासून तो राजाच्या राजवाड्यापर्यंत सगळ्या राहत्या इमारतींत भरला आहे. हा पांच रुपयांत होतो, वीस रुपयांत होतो, पन्नास रुपयांत होतो, आणि ह्याला पांच लाख रुपये ही पुरत नाहींत. अशी ह्याची रचना फार विलक्षण आहे. हा दुःखास कारण आहे, असें साधु पुरुष सांगत आले आहेत; आणि तें सांगणें खरें आहे, असें पावलोंपावलीं माणसाच्या अनुभवास येत आहे; तरी तो सोडण्याचें धैर्य सहसा कोणास होत नाहीं यांतून सुख काढण्याची आशा कोणास चुकवितां येत नाहीं. सर्प समजला आहे. तरी तो कदाचित् आपणास दंश करणार नाहीं, अशा आशेनें, त्यावर पाय देण्याचा मोहपाश तोडवत नाहीं. ह्याहून मोठा चमत्कार तो कोणता असावयाचा. "

खोट्या नोटा करणारा—- बंगाल रेल्वे पोलीसीं पुण्याच्या एका ब्राह्मणास पकडलें आहे. त्यानें दरएक १० रुपयाची अशा सुमारें ६४००० हजारांच्या खोट्या नोटा केल्या आहेत हें काम आपण केवळ थट्टा करण्या करितां केलें असें तो ह्मणतो. इं० प्र०

महामारीवर उपायः— मांदाराचीं फुलें, मिरे व पादेलोण हीं समभाग घेऊन त्यांचें खल करून वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्यात. मेल्या मनुष्यास दोन गोळ्या प्रत्येक दोन दोन तासांनीं देत जाव्यात. ह्यापासून जुलाब व वांती लौकर कमी होऊन रोग्यास आराम पडतो. आरंभींच ह्या गोळ्यांचा उपयोग केल्यास रोगी सहसा जाया होत नाहीं. भि० ग्रं०

### नोटीस

रा. रा. लक्ष्मण गोविंद अडगांवकर हल्लीं राहणार शहर एलिचपूर यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस करण्यांत येते कीं तुह्मास माझे वतनदारी पणाची गांवें तालुके जिल्हे एलिचपूर पैकीं कजबे रासेगांव व खानमबाद व इसेगांव या तीन गांवचे तुह्मांस सन १८९४ इसवी सालांत मृत्यु पत्र करून दिलें होतें परंतु तुमचे व माझे आपसांत जे करार झाले होते त्याप्रमाणें तुह्मी वागला नाहीं या करितां तुमचे नावचें करून दिलेलें मृत्यु पत्र व इतर दुसरें प्रकारचे दस्तऐवज करून दिलेले व तुह्मी मजपासून करून दुसरें कागदावर घेतल्या मद्या व तुह्मी दिलेला दस्तऐवज हे सर्व प्रकारचे कागद या नोटिसीनें आज तारखेपासून रद्द केले आहेत. या पुढें तुमचा यांजेपणाचा कांहीं एक हक्क राहिला नाहीं.

पूर्वीं ता. १७ एप्रिल १८९४ इसवी रोजीं अबदास गोपाळ सबनवीस यांजला जें मृत्युपत्र करून दिलें तें मी हमेषा करितां कायम ठरविलें आहे मी मेल्या नंतर मालक तो आहे. ता. १ माहे जून सन १८९५ इ.

(सही) राघव रामचंद्र कुळकर्णी
दस्तुर खुद्द.

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

☞ पुरवणी पहा.

ESTABLISHED IN 1880.

## HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

### जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

### विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

१२०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्त पणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धांशीशि, मस्तक शूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्णी, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी— हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहा-वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केल्ला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरें झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केवर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

---

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

---

नमुना नंबर १४२

### दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग— सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें. वर्ग १३

अर्जाचा नंबर २ सन १८९५

डेपुटी कामिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार अमृता

बापाचें नांव राणुजी ठाकरे

जात कुणबी

राहणार जवळ ता० एलिचपूर

वरील ( अज्ञान ) गोपाळ बापाचें नांव गणपतजी टाकरे जात कुणबी राहाणार जवळ ता० एलिचपूर जि० एलिचपूर यांणें ( याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव, मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्तऐवजा वरून, अगदी जवळचे नातलगपण चे कारणा वरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे माल मिळतीवर सांभाळ करतां या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यां सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख २८ माहे जून सन १८९५ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपआपल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी. ता० २० माहे मे सन १८९५ इ०

H. Godwin Austen.
Offg. Deputy Commissioner

दि० जज्ज एलिचपूर.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें ( वर्ग १५ ) वि. कौ. मि. नंबर ६

१८९५

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव सारजा बाई

जवजे कृष्णराव देशमुख

राहणार कुन्हा तालुके एलिचपूर

जिल्हा एलिचपूर यांस मयत

कृष्णराव बापाचें नांव खुशालराव देशमुख राहणार कुन्ह तालुके एलिचपूर जिल्हे एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २८ माहे जून १८९५ इसवी रोजीं अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १७ माहे मे सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Offg. Deputy Commissioner.

दि० जज्ज एलिचपूर.

---

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर.

नाशीक

केरकोळ खास ..... ..... ....

Single copy ... ... ... ... ...

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 17 JUNE 1895 — NO 23

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख १७ माहे जून सन १८९५ इ० — अंक २३

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ट वद्य १० शके १८१७

## झांशीची राणी.

मा० अं० पु० चा०

७ पुस्तकारंभीं २८ पृष्ठांची विस्तृत प्रस्तावना देऊन चरित्रकारानें चरित्रलेखनयोग कसा जुळून आला व लेखनसामुग्री दीर्घ प्रयत्न करून कोठून कशी मिळविली ही साद्यंत हकीकत देऊन राणीसाहेबांसंबंधीं लोकांच्या झालेल्या ग्रहाचें व त्यांच्यावर आरोपित केलेल्या सामान्य आरोपांचे सामान्यतः खण्डन केलें आहे. कित्येक टीकाकारांच्या मतें ही प्रस्तावना अप्रस्तुत असून ज्यास्त विस्तीर्ण झाली आहे; परंतु आह्मांस तसें वाटत नाहीं. सदरहू प्रस्तावना अनेक कारणांनीं योग्य असून तींत ग्रथित केलेले विचार फार मार्मिक असल्यानें मोठी सुंदर झाली आहे. हें वाचकांच्या लक्षांत येण्यासारखें असल्यानें तिच्या अवश्यकतेबद्दल ज्यास्त प्रतिपादन करण्याची जरूरी दिसत नाहीं. निव्वळ राणीसाहेबांच्या वृतान्त कथनार्थ ह्या चरित्रांत १६ प्रकरणें आहेत. प्रत्येक प्रकरणांत चरित्रकारानें आपण लिहिलेल्या हकीकतीस प्रमाणभूत ह्मणून अनेक इंग्रजी ग्रंथातून भरपूर उतारे घेतले आहेत. प्रसंग विशेषी देशी बखरांवरून मिळालेले आधारही दाखल केले आहेत. झांशी संस्थानिकांबरोबर इंग्रजांनीं केलेले तहनामे, पत्रव्यवहार, खलीते, ठराव हे चरित्रांत दाखल केले आहेत. संस्कृत प्राकृत कवींचीं वचनें ठिकठिकाणीं गोंविली आहेत. लक्ष्मी बाई साहेब, सर ह्युरोज, लार्ड क्यानिंग, आणि श्री. दामोदर राव साहेब यांचा उद्वेगजनक वृत्तांत देऊन ग्रंथाची समाप्ति केली आहे. श्रीमंताच्या दैवदुर्विपाकाची दिलेली कहाणी फार हृदयद्रावक आहे! हें चरित्र वाचून अंगांत स्वदेशाभिमानाचें वारें संचरतें आणि लक्ष्मी बाईच्या अलौकिक पराक्रमासंबंधी वाचकाच्या मुखातून शतशः धन्यवाद निघतात!

८ लक्ष्मी बाईचा जन्म तारीख १९ माहे नोंवेबर सन १८३५ सालीं झाला; लग्न ७ व्या वर्षीं झालें ( १८४२ ); सोळाव्या वर्षीं पुत्रवती होऊन तें मूल २।३ महिन्यांतच वारलें ( १८५१ ); तयाच्या आठराव्या वर्षीं असह्य वैधव्य दुःख कपाळीं आलें ( १८५२ ) आणि अंत तेविसाव्या वर्षीं झाला ( १८५८ जून १८ ).

९ लक्ष्मी बाईच्या बाळपणचें वर्णन ग्रंथकर्त्यानें असें केलें आहेः— " मनुबाईचें सुंदर बालरूप पाहून कोणाचेंही चित्त हर्षभरित होत असे. त्यावेळीं हीच बालमूर्ति पुढें हिंदुस्थानांतील अलौकिक पराक्रमराशी होईल अशी कल्पना कोणाच्या स्वप्नींही आली नाहीं. मुलगी सुस्वरूप व बाळसेदार असून तिचा वास नहमीं पुरुषवर्गामध्यें असल्यामुळें श्रीमंताच्या पदरचीं सर्व मंडळी तिला मोठ्या प्रेमानें घेत असत. तिचे ते पाणीदार व विशाल नेत्र आणि गौरवर्ण मुख पाहून प्रत्येकांस आनंद वाटत असे या मुळें ती मनमोहक मुलगी बापाचीच काय पण सर्वांची लाडकी होऊन गेली होती. बाजीरावच्या पदरची प्रमुख मंडळी या मुलीची चपळ व सतेजवृत्ति पाहून तिला मोठ्या कौतुकानें ' छबेली ' ह्मणत असत. "

१० पति मृत झाल्यावर लक्ष्मीबाईनीं जो अंतःकरण होरपळून टाकणारा शोक केला आणि त्यावेळीं जी त्यांची दुर्धर स्थिति झाली होती यांचें चरित्रकारानें केलेलें वर्णन वाचून, पतिमरणोत्तर जी उत्तरेची झालेली स्थिति मोरोपंतानें गांधारीच्या मुखें स्त्रीपर्वांत कथन केली आहे त्या प्रसंगाची आठवण होते. मोरोपंत ह्मणतातः—

अंकीं मस्तक घेऊनि ती बाळा उत्तरा पहा पतितें
चिबुक धरूनि बोलवितें ' लिहिलें ऐसें कसें महापतितें. ' १
ह्मणते " मौन त्यजुनि स्मितपूर्वक एक बोल बोला जी !
ती कशी निवेल तुमच्या प्रियवागमृतींच नित्य लोला जी ? २
हा जन सखी समाजीं तुमचा सोडून काय पद रमला ?
चुकलें क्षमा करावी पसराया उशिर काय पदर मला ! ३
नेत्रें उघडून पहा दासी तुमचीच. हें नव्हे अन्या.
मलतीं स्पर्शील कशी ? मी सत्य विराटनृपतिची कन्या ४
हा सातवा परिचया मास, पहा गणुनि लोटले साच
इतक्यांत कसें विटला ? साधु ह्मणति सख्य साधुशीं साच. ५
तुजवाचुनि वाचुनि सुख कैंचें ? हा काय भार तार मला.
जे हंस मानसीं निज हंसीविण काय भारता रमला ? " ६
उदकीं लवण तसें हे करिलीच शोकांत उर विर्मन सती.
असती मृदु तरि पळ या तापे लोकांत उरविली नसती ! ७
आयातें दायातें ह्मणते " मन लाविलीं बळेंच संवे
कां मोडितां तुह्मीच ? क्षण आतां स्वपति वेगळे नसेंव. ८
पति जवळूनि कां नेतां नेउनि हितबोध करुनि खालींत
तुमच्याहि असें अंतर पडलें कां गे क्रियेंत बोलींत ! ! ९

खरेंच आहे ! तारुण्यनवतीचा भर, अमर्याद ऐश्वर्य, अप्रतिबंध मना ह्या सर्व गोष्टी अनुकूल असतां दैवदुर्विलासानें वैधव्यकुठारीचा आघात कपाळीं पडणें हें, हाय हाय ! फार असह्य आहे !

११ झांशी संस्थान खालसा केलें त्यावेळीं हिंदुस्थानचे प्रतिनिधी लार्ड डलहौसी होते. राज्यकारभारांत कोणतें नीतितत्व प्राधान्यें करून होतें व इंग्रजांनीं आपली सत्ता ' चंचुप्रवेशात् मुसलप्रवेशः ' या न्यायानें हिंदुस्थानांत कशी परिवर्धित केली हें वर्णन चरित्रकारानें मोठ्या गमतीनें केलें आहे! सुप्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार चार्लस डिकिन्स याची नर्मप्रचुरलेख लिहिण्या बद्दल ख्याति आहे. अशा धाटीचा मासला पहाणें झाल्यास ६०।६१।६२।६३ हीं पृष्ठें वांचून पहावीं.

१२ जो कोणी हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याच्या इतिहासाचें विचारपूर्वक परिशीलन करील त्याच्या ही गोष्ट लक्षांत आल्या वाचून रहाणार नाहीं कीं, इंग्रज लोक ' आह्मी स्वतःच्या बाहुबलानें हिंदुस्थान देश पादाक्रांत केला ' अशी जी वीर्योद्दीपक उक्ति वारंवार काढतात तींत विशेषसा अर्थ नाहीं. हिंदुस्थानची जितकी लोकसंख्या आहे तितकीं मेंढरें येथें असलेल्या इंग्रज सैन्यास राखण्या करितां दिलीं असतां त्यांची नुसती राखणी करणें देखील अशक्य आहे. मग पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे राजेरजवाड्यांस कीं ज्यांनीं आपल्या बाहुबलानीं अटकेपार जरीपटका फडकावून एक वेळ सर्व जगास चकित करून सोडलें त्यास बाहुबळानें धुळींत मिळविल्याची गोष्ट कशास पाहिजे ? हा हिंदुस्थानांतील प्रकार झाला. यूरोपांत तरी समजोर राष्ट्राशीं रणसंग्राम करून इंग्रजांनीं आपलें बाहुबल कोठें प्रगट केलें आहे ? तिकडे इतिहास प्रसिद्ध असें काय ते दोन विजय त्यांनीं मिळविले आहेत. त्यां पैकीं एक वाटर्लु येथील होय. वाटर्लुच्या युद्धांत सर्व यूरोपखंडास पादाक्रांत करून ' निर्वीरमुर्वीतलं ' करणाऱ्या नेपोलियनाचा मोड कां झाला आणि त्याचें श्रेय इंग्रजी शस्त्रांस किती द्यावयाचें हें इतिहासज्ञास वेगळें सांगणें नको. त्या प्रमाणें दुसऱ्या एका अशाच प्रसिद्ध युद्धांत आपल्या वेळीं इंग्लिशास शत्रूचे लोक येऊन मिळाले नसते तर त्यांची किती दुर्दशा उडाली असती हेंही आतां सर्वांस कळून चुकलें आहे. स्पेन्सर साहेबांनीं यूरोपियन लोकांविषयीं एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं:—

" ज्या शिपाईगिरीच्या कामाला यूरोपियन लोक येवढा मान देतात त्याचें वास्तविक स्वरूप तरी काय असतें? स्वदेशावर परचक्र आलें असतां त्याचें निवारण करणें यवढेंच त्या शिपायाचें कर्तव्य असतें काय? ह्या प्रश्नाचें उत्तर उघडच नाहीं असें द्यावें लागेल. तर मग पराक्रमी योद्ध्यांचा आणि अगदीं साध्या शिपायाचा येथील लोकांना अभिमान वाटतो तो कोणत्या कामगिरी बद्दल ? एखाद्या राष्ट्राचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य त्याला परत मिळवून देण्या करितां काय ? छेः छेः त्यांचीं अभिमान बाळगण्या सारखीं कृत्यें फारच वेगळीं आहेत. स्वतंत्र राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यास वशावळीं उतरण्याच्या कामीं जें त्यांचें शौर्य दिसून येतें त्याबद्दल त्यांची एवढी प्रशंसा चाललेली असते. बरें, ज्या राष्ट्रांशी सामना केला जातो तीं तरी बरोबरीच्या नात्याचीं असतात काय? छेः ती गोष्ट बोलूं नको. बरोबरीच्याशीं होतां होईल तों प्रसंगच आणावयाचा नाहीं. त्यांची जी तरवार चालते ती गाय बापड्यांवर. वाघानें बकरीला गिळंकृत करण्यांत जें शौर्य दाखवावें तेंच युरोपियन राष्ट्रें गरीब बिचाऱ्या लोकांचे देश काबीज करण्यांत दाखवितात. तथापि राज्यतृष्णेचें सामर्थ्य फार मोठें आहे. तिच्यामुळें मनुष्याला लाज आणणारीं नीचपणाचीं कृत्यें थोरपणा पावतात व तीं करणारांचें गौरव केलें जातें. " असाच प्रकार झांशी संस्थान खालसा करिते वेळीं इंग्रजांनीं केला नाहीं असें कोणाच्यानें ह्मणवेल काय ! अहिल्याबाईवर स्वारी करण्याचा प्रसंग आला असता ती स्त्री ह्मणूनच पेशव्यांनीं माघार घेतली. पण झांशीची राणी स्त्री होती तिची इंग्रज सरकारास काय पर्वा! हिंदूंपेक्षां इंग्रजी नीतितत्व कांहीं वेगळेंच आहे !

१३ त्याच प्रमाणें दुसरीही अशी गोष्ट लक्षांत येईल कीं, " यथा राजः तथा मंत्रिणः " अशी हिंदुस्थानच्या राज्यकारभारात परंपरा चालत आली आहे. ह्मणजे मुख्याधिकारसूत्रें ज्याच्या स्वाधीन असतील त्याची त्या वेळीं जीं मतें असतील त्यांस अनुलक्षून हाताखालील वरिष्ठ अधिकारसंपन्न वर्गाचें वर्तन होत असतें; झांशी संस्थान खालसा केलें त्या वेळीं बुंदेलखंडचे मुख्य पोलिटिकल एजंट मेजर मालकम साहेब होते. हा अधिकारी मोठा निष्पक्षपाती असून एतद्देशीयां विषयीं त्याच्या मनांत प्रीति वसत होती; परंतु त्या वेळचीं राज्यसूत्रें लार्ड डलहौसी साहेबांच्या हातीं असून त्यांनीं देशी संस्थानिकांचें सत्र आरंभिलें होतें. ह्या सत्राच्या परिपूरणार्थ आपणही यथाशक्ति हातभार लावावा अशी इच्छा मालकम साहेबांस प्रथम झाल्या शिवाय राहिली नाहीं ! लार्ड रीपन ज्या वेळीं गव्हरनर जनरल होते त्या वेळच्या प्रमुख अधिकाऱ्यांचें जें वर्तन होतें तें ते गेल्यावर कायम राहिलें नाहीं; लार्ड रीपन साहेबांच्या वेळचें त्यांचें वर्तन लार्ड हारिस साहेबांच्या वेळीं अगदीं बदललें; आणि आतां

लार्ड स्पान्डहर्स्ट साहेब येतांच त्याच वर्गाचें वर्तन बदलल्याचें भासत आहे. या कारितां हिंदुस्थानचीं मुख्याधिकारसूत्रें ज्याच्या हातीं सोंपवावयाचीं आहेत तो उदारमतांचा, विद्यालंकृत, दयाळु, नीतिमान आणि निश्चयी असला पाहिजे. नाहीं तर देशी संस्थानिकांस पितृदेशाविपत्ती प्रमाणें वाटणारे लार्ड डलहौसी गव्हरनर जनरल असतां त्यांनीं पेरून ठेविलेल्या कटु बीजांचा परिणाम चाखण्याचा एकदां प्रसंग आला तसा पुन्हा आल्या वांचून राहणार नाहीं.

१४ झांशी संस्थानांत कर्ता पुरुष कोणी राहिला नाहीं— लक्ष्मीबाई साहेब बोलून चालून अबला; त्यांत वैधव्यकुठार पडून त्यांचें हृदय शतदां विदीर्ण झालेलें; असा सर्वतोपरी अनुकंपनीय प्रकार असतां इंग्रज सरकारांनीं ह्या संबंधीं जें गर्हणीय वर्तन करून आपल्या राज्याला काळिमा आणिला तें पाहून वाचकांची वृत्ति संक्षोभित होते, त्याला उद्वेग प्राप्त होतो व तिरस्कारद्योतक उद्गार त्याचे मुखांतून निघतात.

१९ इंग्रज सरकारच्या पदरीं असलेल्या झांशी येथील शिपायांनीं त्यांची, त्यांच्या सुकुमार बायकांची आणि कोमल अर्भकांची केलेली कत्तल वाचून प्रत्येकास वाईट वाटतें; परंतु रानटी हिंदुलोकांपेक्षां नीतिमत्तेंत फार पुढें गेलेल्या इंग्रज लोकांनीं, झांशी येथें बायकापोरासुद्धां चट साऱ्या गरीब रयतेची जी भयंकर कत्तल केली ती वाचून अंगावर शहारे उभे राहतात! बंडवाल्या लोकांचा मोड करण्या कारितां इंग्लंडहून गोरें सैन्य आणाविलें होतें. तें जेव्हां मुंबईस उतरलें तेव्हां त्यांनीं किनाऱ्यावर ५१२९ हिंदुलोक पाहिले. ह्या निःशस्त्र गरीब लोकांस पाहतांच त्यांनीं आपल्या रायफली सज्ज करून निशाण धरिलें इतक्यांत कपतानानें त्यांस मना केलें. त्या वेळीं त्यांना मोठा चमत्कार वाटला त्यांना वाटलें कीं, आपल्यास 'मुर' लोकांचें (हिंदूस त्या वेळीं हे लोक मूर ह्मणत असत) निर्मूलन करण्या कारितां आणिलें असून कपतानानें मनाई करावी हें फार विलक्षण आहे. आयते हातीं सांपडलेले लोक सोडून देऊन दुसऱ्याच्या शोधार्थ गांवोगांव फिरावें हा कोण मूर्खपणा? या गोष्टी वरून वाचकांस कळेल कीं, हे लोक त्या वेळीं किती पशुतुल्य बनले होते. या धामधुमीच्या वेळीं इंग्लंदांत एका वक्त्यानें भर सभेंत केलेलें संभाषण मासलेदार असल्यामुळें त्यांतील पुढील वाक्यें एका इंग्रजी ग्रंथांतली दिलीं आहेत:—

When the rebellion has been crushed out from "Himalayas to Comorin, when every gibbet is red with blood; when every bayonet creaks beneath its ghastly burden; when the ground in front of every cannon is strewn with rags and flesh, and shattered bone;— then talk of mercy. Then you may find some to listen. This is not the time."

किती हे दुष्ट विचार! या वेळीं इंग्लिश लोकांच्या मनाची स्थिती कशी रुधीरप्रिय झाली होती आणि मनुष्यभक्षक फिलीपाईन लोकांवर त्यांनीं ताण केली याची कांहींशी कल्पना आपल्यास कारितां येईल. जनरल नील साहेबांनीं बंडाचा मोड झाल्यावर लोकांचे जे हाल केले त्या संबंधीं अमृतबझार पत्रिकेंत मागें एक हकीकत प्रसिद्ध झाली होती. ह्याच जनरल नील साहेबां संबंधीं एक ग्रंथकार ह्मणतो:—

Who does not remember those days when every one chucked to hear how General Neill had forced high Brahmins to sweep up the blood of the Europeans murdered at Cawupore aud theu strung them iu a raw without giving them the requisitive time for the rites of purification.

झांशी येथील 'विजनचें' चारित्रकारांनीं दिलेलें वर्णन वाचणें फार कष्टद आहे! तसें तेथील वेढ्यांत राणी साहेबांनीं दर्शविलेलें अप्रतिम साहस, अलौकिक युद्धचातुर्य व अमानुष पराक्रम, यांचें वर्णन फार बहारीचें आहे तें वाचून भारती युद्धाचें स्मरण वाचकांस होतें.

मा० अं० पु० चा०

## शिवाजी महाराजांची समाधि

(वऱ्हाडांत वर्गणी जमविण्याविषयीं विनंती.)

अठराव्या शतकाच्या अखेरीस वाशिंगटनानें इंग्लंदच्या जुलमी अमला खालून सोडवून अमेरिकेंत स्वतंत्र राष्ट्राची स्थापना केली; या महत्कृत्य बद्दल तेथील लोकांनीं त्याच्या स्मरणार्थ पुतळे उभे केले, इमारती बांधल्या, त्याच्या नांवानें एक टोलेजंग शहर वसविलें आणि त्याची मृत्युतिथी तेथील लोक आज [illegible] मोठ्या भक्तीनें पाळीत आहेत! वाशिंगटनाच्या पूर्वी एक शतक— ह्मणजे सतराव्या शतकांत शिवाजी उदयास येऊन त्यानें महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्याची प्राणप्रतिष्ठा केली आणि मोंगलाच्या जुलमी अमलांतून देशबांधवास मुक्त केलें. मोंगलाईंत प्रजेस जितका जुलूम व कहर सोसावा लागला तितका अमेरिकेस सोसावा लागला नाहीं; मोंगलाईंत प्रजेस दुस्सह गुलामगिरींत दिवस कंठावे लागले परंतु अमेरिका पूर्णपणें स्वतंत्र होण्यापूर्वींच ती पुष्कळ अंशीं स्वतंत्र होती; ज्या अर्धनग्न स्थितींत राहणाऱ्या मावळे लोकांच्या सहाय्यानें शिवाजीनें हिंदुपदपादशाही स्थापिली त्यांची आणि वाशिंगटनानें ज्या सुधारलेल्या देशबांधवांच्या सहाय्यानें अमेरिका स्वतंत्र केली त्यांची तुलना केली असतां दोहोंत जमीन अस्मानचें अंतर होतें असें दिसून येईल. वाशिंगटनाची योग्यता जरी आह्मी कमी समजत नाहीं तरी त्याची आणि शिवाजीची तुलना केली असतां वाशिंगटनाच्या विजयाबद्दल जितकें आश्चर्य वाटतें त्यापेक्षांही शिवाजीच्या कृत्याबद्दल विलक्षण जास्त आश्चर्य वाटतें!

अमेरिकेंतील जानपदानें वाशिंगटनावर सन्मान—पुष्पांचा वर्षाव केला! त्यांचें इतकें देव्हारे माजविले कीं, आह्मी खंडोबा बहिरोबा इत्यादिकांचें सोन्यारुप्याचे टांक देव्हाऱ्यांत मांडून त्यांची नित्य बिल्वपत्रादिकांनीं पूजा करितों तेवढेंच करण्याचें काय तें त्यांनीं कमी केलें! पण आमच्या देशांतील लोकांनीं शिवाजी संबंधीं कोणतीं स्मारकें केलीं? त्या महात्म्याचे उतराई होण्याचा काय प्रयत्न केला? ह्या प्रश्नांचे उत्तर देण्याची वेळ आली ह्मणजे शरमेनें आह्मास माना खाली घालण्याचा प्रसंग येतो. हेच आमचे शिवाजी महाराज ह्या कृतघ्न व कर्तव्यपरांमुख देशांत जन्मास न येतां अन्य देशांत जन्मले असते तर अलौकिक क्षात्रतेजानें व चातुर्यानें स्वतंत्र राष्ट्राची स्थापना केल्या बद्दल त्यांचा आजला केवढा गौरव झाला असता! त्या देशांतील लोकांनीं त्यांच्या गुणांचे किती पोवाडे गायले असते! आणि त्यांचीं स्मारकें भिन्नभिन्न रूपांत आजला किती तरी दिसलीं असतीं किंवा ह्याच आर्यावर्तांत त्यांचा जन्म पौराणिक काळांत झाला असतां तर, श्री रामचंद्राच्या स्मरणार्थ आजला जशी आह्मी रामनवमी पाळीत आहोंत; अथवा श्रीकृष्णा बद्दल जन्माष्टमी पाळीत आहोंत; अथवा ह्या पुराणकाळीं होऊन गेलेल्या महापुरुषांस देवत्व प्राप्त होऊन, रामविजय हरिविजय, इत्यादि ग्रंथांची आह्मी भक्तीनें पारायणें करित आहोंत, त्याच प्रमाणें शिवाजी महाराजांच्या स्मरणार्थ आमच्या आर्य पूर्वजांनीं शिवाजी विजय अथवा शिवाजी पंचमी नाहीं तर षष्टी असें कांहीं तरी करून ठेऊन महाराजाचें चिरस्थाई स्मारक केलें असतें व तें पूर्वाचारा प्रमाणें आजला आमच्यांत चालू राहिलें असतें.

एखाद्या अत्यंत सुंदर व टोलेजंग इमारती समोर उभें राहिलें असतां तिच्या सौंदर्याकडे आणि भव्यतेकडे आपलें सर्व लक्ष वेधलें जातें, पण ह्या इमारतीस आधारभूत असलेला पाया जमीनींत गढला गेल्यामुळें त्याचें महत्व आपल्या दृष्टीस येत नाहीं तद्वत पेशवाईंत शिवाजीच्या चिरस्थाई स्मारका बद्दल प्रकार झाला असेल असें आपण मानूं. ह्मणजे मराठी राज्यास पायाभूत असलेले शिवाजी महाराज निर्गत होऊन त्यांचा देह मातीत मिळाला आणि त्या पायावर पेशवाईची भव्य व सुंदर इमारत उभारली गेल्या कारणानें प्रेक्षकांचें सर्व लक्ष इमारतीच्या सौंदर्याकडे गुंतून जाऊन त्यांच्या मनांत पायाचा विचार आला नाहीं. पण पुढें ह्या इमारतीचा, निर्दय काळाच्या तडाख्यांत सापडून दुर्दैवानें ह्मणा अथवा आंत राहणाऱ्या लोकांच्या नालायकीनें, ह्मणा, नाश होऊन ती बरबाद झाली तेव्हां तिस आधारभूत असलेल्या पायाचें गंभीर व उदात्त स्वरूप प्रेक्षकांच्या दृष्टीस पडलें! आणि तें अजस्त्र काम पाहून त्यांनीं आपले ओंठ अंगुलीनें आच्छादित केले!

पण आमच्या अंगीं जें आलस्य व औदासिन्य ओतप्रोत भरलें आहे त्या मुळें आह्मी जीवंत असून नसल्या सारखे आहों! आह्मी आमच्या कर्तव्यास विसरलों, आमच्या पूर्वजांस विसरलो; आणि जी हीनता रानटी लोकांतही सापडावयाची नाहीं अशा अत्यंत नीचतर हीनतेंत आह्मी आपला एक एक दिवस कमूं लागलों. एखादा मनुष्य स्वप्नांतून खडबडून जागा होतो अथवा दीर्घ काळच्या कुंभकर्णी झोंपेंतून उठतो तशी जागृति आह्माला ही कधीं कधीं येत असते आणि ह्या जागृतावस्थेंत मात्र सभोंवार दृष्टी फेंकून आह्मी चालूं स्थितीचें पर्यवलोकन करीत असतों. अशा जागृतीची पाळी आल्यामुळें हल्लीं शिवछत्रपतीच्या संबंधानें सर्व महाराष्ट्रांत मोठी चळवळ उडून राहिली आहे. शिवाजी महाराजांनीं स्वतःच्या देहाची पर्वा न धरितां आह्मा कारितां काय केलें हें सांगणें ह्मणजे मशालीनें सूर्य दाखविणें होय! अशा महापुरुषाच्या समाधीचा जीर्णोद्धार करून कांहीं तरी कायमचें स्मारक करावें ह्मणून नुकतीच पुण्यास मोठी थोरली सभा भरली होती व प्रांतोप्रांतीं ह्या स्मारकाच्या कृत्यास मदत देण्याकरितां खटपटी चालूं आहेत. आपल्या वऱ्हाडांत कांहीं वर्गणी जमेल काय?

---

चित्राळच्या लढायींतला मुख्य मोहरा उमराखान हा हल्लीं काबुलास अटकेंत आहे. काबुलचे अमिर अबदूल रहिमान हे इंग्रज सरकारचे कट्टे व निस्सीम दोस्त आहेत ह्मणून त्यांनीं इंग्रजाचा शत्रु जो उमराखान यांस त्याच्या बरोबरच्या लोकांसह तुरुंगांत टाकलें आहे. 'पायोनिअर' पत्रकर्त्यांनीं खेद प्रदर्शित केला आहे कीं उमराखाना सारख्या राजपुरुषास असा कष्टमय व प्राणघातक बंदिवास अमीरांच्या मुसलमानी राज्यांत भोगावा लागेल असें कोणास वाटलें नव्हतें. अशा कृतीनें अमीरावर इंग्रज सरकारची भारी कृपा होईल आणि अमीर इंग्रजांच्या मर्जींत चढतील हें खरें पण अमिरांस अशा वर्तनाबद्दल सर्व जग दोष लावील. पराजितावर इतका प्रकोप करण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं आणि शिवाय उमराखानानें इंग्रजांशी लढाई आरंभण्यांत कांहीं अपराध केला होता असें आह्मास वाटत नाहीं. उमराखानाचा मुलूख खालसा करण्यांत यावा असा सरकारचा विचार दिसतो आणि तसें झाल्यास उमराखानास कांहीं वर्षासन करून द्यावें आणि त्यांस अमिराच्या अटकेंतून खुलें करावें असें लोकमत सांगतें.

---

राष्ट्रीय सभेचे जे पुढारी मुत्सदी तेच लोक सरकारी कायदे कौंसिलांतून सभासद होत आहेत ही गोष्ट राष्ट्रीय सभेची अन्वर्थता व महिमा दाखविते. राष्ट्रीय सभेचे मुख्य मुख्य लोक विद्वान, अग्रणी व कार्यकुशल आहेत तेव्हां अशांचीच बहुमतानें कायदेकौंसिलदारि साठीं निवड होते हें यथार्थ आहे. राष्ट्रीय सभेचे चालक तेच सर्व राज्याचे खरे आधारस्तंभ व वाटाडे आहेत कारण त्यांच्याच सल्यानें सर्व जनसमूह चालणारा आहे. राज्याची मजबुती जनसमूहाच्या सौख्यावर अवलंबून असते आणि जनसमूहाचे हितदर्शक व राज्याचे प्रवर्तक लोक हेच सरकारचे मंत्रिमंडळांतले प्रधान पुरुष असले पाहिजेत. राज्यकर्ते व प्रजाजन यांच्या मध्यें प्रेमभाव वर्धन करणारा खरा मध्यस्त व मंत्री राष्ट्रीय सभा ही होय. जे सूज्ञ, दूरदर्शी, व लोकहितवादी आहेत ते राष्ट्रीय सभेचा जयजयकार मना पासून इच्छितात आणि राष्ट्रीय सभेंतले अग्रेसर लोक सरकारच्या कायदे कौन्सिलांत आले ह्मणजे त्यांस आनंद वाटतो.

पण कांहीं आंग्लो इंडियनांस नेटिवांचा प्रवेश अगदीं कुपथ्या प्रमाणें वाटतो. कलकत्ता मुनसिपालीटींत एक मौजेचा फार्स उडाला. नामदार सुरेंद्रनाथ बानरजी यांस बहुमतानें मुनसिपाल कारपोरेशन तर्फे कायदेकौंसिलदार निवडण्यांत आलें. ही गोष्ट ऐकून 'इंग्लिश मन' सारख्या पत्रकर्त्यांचें मनोराज्य विलयास गेलें आणि ते वेड्या प्रमाणें विचित्र दोषविस्फोटन आपल्या कल्पना सृष्टींतून निर्माण करूं लागले आहेत. बाबू सुरेंद्रनाथ हें नांव घरच्या माणसाच्या नांवा प्रमाणें

आळखोचें आहे तेव्हां त्यांची निवड ही मोठ्या अत्यानंदाची गोष्ट झाली.

मुंबईच्या कायदे कौंसिलदारी करितां लोकमतानें दक्षिण भागा तर्फे रा. रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल. एल. बी. यांस निवडलें होतें. वांबे ग्याझिट कर्त्यांनीं अकांड तांडव केलें आणि गव्हरनर साहेबांनीं ही निवड नामंजूर करावी असेंही सुचविलें. पण अशा, काकश्रापाला कांहीं फळ नसतें त्याप्रमाणें अखेर निकाल झाला. आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं राजश्री टिळक यांची निवड कायम झाली. नामदार बाळ गंगाधर टिळकांची कौंसिलदारी लोकमान्य व राजमान्य होवो असें आह्मी इच्छितों.

The Berar Samachar

MONDAY JUNE, 17, 1895

LEADERS OF MASSES

No. IX

(Concluded)

An appeal to the imagination was one of the means of lashing people into a manifestation of irresistible enthusiasm. Napoleau knew when to do this. Mahomet had also resort to that powerful stimulus when occasion demanded. On the eve of the battle of Pyramids Napoleon appealed to the imagination of his legions by one sentence—Pointing at the Pyramids, he said soldiers three thousand years are looking down upon you. This was no idle sentiment as some have alleged. It has a profound meaning for the purpose for which the rhetoric was employed. Let it be so with those who have taken upon themselves to discipline our forces. Ultimate leadership viz, that which leads a universal idea to its ultimate fruition, possesses certain attributes. Preliminary disciplinarians require them no less. Perhaps the latter are the important of the two. Man must rise to the stature of those grand ideas. Littleness is incompatible with their Titanic proportions. For, they it is which expand foster and exhibit the marvel of humanity's loftiness. Unflinching honesty, god—like courage, self—sacrifice of the martyr and poetic enthusiasm for the cause constitute what is loftiness in human nature. In these days many countrymen do work and suffer to a certain extent for the ideas they wish to propagate. But we are forced to confess the truth that their convictions do not guide their action. They do these things for *policy*. A deep, reserved and intriguing man we call, in the cant of these days, a political man. We should consider that man a scoundrel and an object of contempt. Those that have not the courage of their ideas, or honesty enough to express them need the doubtful help of that reserve and intrigue. It is true that circumstances make men dishonest and intriguing; but what an absurdity we fall into, when we recognize that it is those very circumstances that we ought to endeavour to destroy. One's heart should be grieved to see this state of things. Such men are from their nature incapacitated from leading a large idea that means an open, brave defiance of any thing that impedes its progress. That means that men shrink from the self-sacrifice which the cause demands of them. To rise to the height of the situation, to remain unmoved though the heavens should crack over head, to view with a serene gaze the earth yawning under foot into a formidable abyss and to hold the idea dearest to one's heart is true divinity. In icy regions of the earth it has often happened that mercenary mothers have flung their babies to wolves to save themselves. Perhaps people now-adays do this. I do it. You do it. All do this. Luther never did this. Washington never did it. They are, though dead long ago, yet the symbols of great ideas which have done the earth so much good. It is no use to condemn a man but to do so under the circumstances is unjust. We point out an idea of a leader of masses to which man may aspire.

The poverty of India is alarming. It has become the radical evil of all further reforms. It is no safe attempt to keep the rulers in ignorance of it. They may not have a clear insight into the depths and dimensions which the poverty of the people has reached. But whoever has eyes to see and holds his head over his shoulders cannot but recognize this *stern* fact which will face our rulers in their evasive efforts. Difficulties must be duly surmounted or otherwise they multify at each evasion of them. The Government will fall deplorably short of its duty towards the people if it will not adopt in right earnestness the most effective and remedial measures. The danger must be fore seen in time. The stability of a Government is at stake in such questions as these. The test of a good Government is that it must supply work to its people to earn a honest living. In the real sense of a nation's material prosperity. India is fast sinking in its material wealth. Industrial and commercial activity is hardly seen. Agriculture is the main and the only profession of the nation. India is just like a honey—comb where so many people of the subject classes lay honey and it is a privilege of the rulers to usurp themselves the golden fruit of the Indian labour.

The Hindu of Madras contains in one of its last week's issues a similar and able article on the Indian peasant. Towards the close of it the learned editor proceeds to observe:—

"Experts in the science and practice of agriculture have pointed out such serious symptoms about our present position in regard to land as the following:—(1) "So far as can be judged, the supply of cattle for agricultural purposes has dwindled considerably as well as gone off in quality;" (2) "there are not wanting grave indications as to the deterioration of the soil all over India, owing to excessive cropping, want of fallows, and insufficiency of manure? Are these statements true or not? These are statements made by European observers, and not by "Educated Hindus." We are aware that we daily and hourly hear similar statements from our own agricultural population. If Government is not disposed to pay attention to our own representatives, at least let them investigate the statements which are made by Englishmen who have observed for themselves the position of our agricultural population and do what is needful to give them relief. We have no model farms; we have, in fact, none of the agencies by which civilised and popular Governments improve the practice of agriculture and increase the produce of land. A writer, thoroughly well-qualified to pronounce an opinion on the subject sums up the situation of agricultural India in the following concise language:—"*An impoverished people, an imperfect cultivation by fewer and weaker bullocks, on a too often deteriorated soil, increased taxation, and, on the top of all, a drought.*" Is not Mr. Dadabhai Naoroji justified by this description of the condition of India in denouncing the Government of India for doing nothing to mitigate the poverty of its people. Mr. Dadabhai and the Congress party say the same thing, perhaps in stronger language; and they are justified in doing so, because they have a stake in the country far greater than the English writer whose words we have just quoted, and they come into closer contact with the suffering and toiling millions of this land."

## वऱ्हाड

हवामान— दोन तीन पाउस चांगले झाले. हवेंत थोडा गारवा आला आहे. रोगराई कांहीं विशेष नाहीं.

रा. रा. रामचंद्र बापूजी पतकी हे सिकंदराबादेस बदलल्या मुळें रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री यांस खामगांवाहून इलिचपुरास १२५ रुपयांवर क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

रा. रा. रंगनाथ विष्णु डेपुटी क्लार्क निसबत कमिशनर यांस १०० रुपयांवर खामगांव स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

आणि इलिचपूर डेपुटी कमिशनरचे इंग्लिश ऑफिसांतील ७५ रुपयांवरील क्लार्क रा. रा. गणेश भिवराज यांस ७० रुपयांवर कमिशनर कचेरींत नेमण्यांत आलें.

रा. रा. मारुती मोहनराव तहशिलदार, मोर्शी यांची बदली चिखलीस होऊन रा. रा. यशवंतराव महादेव तहशिदार हे रजेवरून परत आल्यानंतर मोर्शीस दाखल होतील.

मि. अबदूल कदूस नायब तहशिलदार हे फर्लोवरून आल्यानंतर बाळापूरास तहशिलदार होतील असें कळतें. ही जागा रा. रा. दामोदर नानाजी शिंदेकर यांस मिळेल असें वाटलें होतें पण त्यांचा दैवदुर्विपाक अद्याप संपला नाहीं असें दिसतें.

रा. रा. उद्धव माधव बारे यांस अकोल्यास सब डेपुटी इन्स्पेक्टर नेमून त्यांच्या मुर्तिजापूरच्या शाळेवर रा. रा. गंगाराम आत्माराम सबनवीस यांस नेमिलें.

ट्रेनिंग कालेजांतील उर्दू कडील फर्स्ट असिस्टंटच्या जागीं मि० महमद हुसेन यांस बढती देण्यांत आली.

गेल्या १२ वे तारखे पासून कमिशनरचें काम मि० बुलक साहेब पाहूं लागले. इच्छा एवढीच कीं साहेब मजकुरांनीं आपल्या पित्या प्रमाणें व बंधु प्रमाणें लोकप्रेम संपादावें आणि उत्तरोत्तर भरभराटीस चढावें.

कर्नल लेन साहेब यांचा पगार डेपुटी कमिशनर वर्ग २ चा करून त्यांच्याकडे अबकारी खातें देण्यांत येत आहे असें प्रमोदसिंधू वरून कळतें.

वाशिमकर करुणेश प्रासादिक नाटककार मंडळी अकोल्यास आली आहे. तिनें परवां रात्रीं 'छत्रपति संभाजी' चा प्रयोग करून दाखविला. खेळ बरा झाला.

उमरावती हायस्कुलची फर्स्ट असिस्टंटची जागा आज एक वर्ष पर्यंत रिकामी होती ती सब प्रेटिम भरण्यांत येऊन खालील प्रमाणें वर्गवारी झाली आहे:—

| रा. रा. | | पगार | हायस्कूल |
|---|---|---|---|
| विष्णु नारायण डांगे | बी. ए. | १५० | उमरावती |
| शंकर नारायण डांगे | ,, | १०० | आकोला |
| गंगाधर नारायण घाटे | ,, | ७५ | ,, |
| कृष्णराव रामचंद्र काळे | ,, | ६० | ,, |
| कुळकर्णी | ,, | ४० | ,, |
| गाडगीळ | ,, | ४० | उमरावती |

आमचे लोकप्रिय हेअर साहेब सार्वजनिक आरोग्या विषयीं अत्यंत खबरदारी घेतात. तसेंच नळाच्या पाण्या विषयीं लोकांचीं गाऱ्हाणीं तात्काळ ऐकून आपल्या डोळ्या देखत उत्तम बंदोबस्त करवितात. त्यास त्रास वारवार देण्याला लोकांस कंटाळा येतो. पण आमचे नळाकडील व्यवस्थापक पाणी वेळेवर व बेतवार सोडीत नाहींत ह्मणून दुःख वाटतें, दाद कोण घेईल बरें!

आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं रा. रा, भैरव प्रसाद तहशिलदार यांस भरतपूर संस्थानांत पोलीस सुपरिन्टेंडेंटची जागा मिळाली. फार नामी झालें.

नोटास

खानसाहेब भोलेखां वल्लद लालखां खामगांव यांस.

चांदबी माजी मर्द भोलेखां साहेब मुक्काम अमोड ता. मलकापूर इजकडून. नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे भ्रतार असून माझ्याशीं सुमारें तीन सवा तीन वर्षें झालीं लग्न झालें आहे. त्या अवकाशांत तुह्मी मला बरेंच छळलें, व त्रास दिला. त्या बद्दल आतां सरकारापुढें मी दाद मागणार आहें. मी आपली बायको ह्मणून आजपर्यंत सर्व गोष्टी सहन केल्या, व त्रासही भोगला. पुढें मी तुमच्या जवळ हात जोडून रदबदली करण्यासाठीं पंचाच्या सल्यानें भावास धाडलें पण तुह्मी त्याच्याशी मारहाण केली आणि मजकडे खुद्द सामोपचाराच्या गोष्टी करण्याच्या मिषानें येऊन मला अद्वातद्वा बोलला व माझ्यावर अशा अपशद्बाचा भडिमार केला कीं त्या अपशद्बाचा अर्थ तुमच्या व माझ्या वैवाहिक हक्काला बाध आणितो. तुमच्या गैरवोलण्यानें धर्मशास्त्रा प्रमाणें माझा लग्न संबंध तुटला. आजपर्यंतच्या खाण्यापिण्याच्या खर्चाबद्दलचें कर्ज तुह्मी फेडलें पाहिजे. माझ्या पूर्वीच्या नवऱ्याचे दागिने परत करावे. तरी या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येते कीं आपण माझे ठरविलेले मेहेर आणि आपण माझ्या पूर्वीचे दागिने घेतले ते व मेहेरचे रुपये व ज्या महिन्यापासून मी आपले आईबापाचे घरी आहे तर तितके दिवसांचा माझा खाण्यापिण्याचा व वस्त्र प्रावर्णाचा झालेला खर्च मला पंधरा दिवसांचे आंत खामगांव पंच मार्फतीनें देऊन रीती प्रमाणें मजपासून पावती घ्यावी. मुदतीचे आंत असें न केल्यास माझा दिवाणी कोर्टात आपणावर वरील कारणाचा दावा लागेल. सदर्हू बद्दल नोटीशीचा व कोर्टाचा खर्च आपले पासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १४।६।९५ इसवी.

(सही)

निशाणी चांदबी माजी मर्द भोलेखा दस्तुर बिसमिल्लाखा वल्लद जहागिरखा राहणार आमोडा तालुके मलकापूर याच्या हातची निशाणी कल्यार.

वर्तमानसार.

अमेरिकेंतील कानडा प्रांतांतील रहिवासी क्लिफर्ड काल्वेल या नांवाचा एक गृहस्थ नायगाऱ्याच्या धबधब्याच्या दोन बाजूला दोरी ताणून बांधून ती वरून अधारांत चालून गेला ही गोष्ट ह्मणजे एकुणिसाव्या शतकांतील एक अजब आश्चर्य होय. कानडा प्रांताच्या बाजूनें सुमारें शंभर फुटावर चालून गेल्यावर तो माणूस अगदीं दिसेनासा झाला. आणि प्रेक्षकांना पक्कें असें वाटलें कीं तो खालीं पडून मेला असावा. अशा भयंकर संशयांत प्रेक्षक मंडळी चार मिनिटें असतांना एकदम दोरीवर तिकडे जाळ झाला; व एकदम चार मेणबत्त्यांच्या उजेडानें धीरानें व अगदीं निर्भयपणें आपला भयंकर मार्ग क्रमीत असतांना तो गृहस्थ दिसला. या गहस्थानें दोरीवर चालण्यासंबंधानें ज्या कांहीं अजब पकडा केल्या आहेत तशा जगांत दुसरें कोठें झाल्या नाहींत असें ह्मणतात. एक वेळां त्या धबधब्याचें खिंडार तो अधांतरीं टांगलेल्या दोरीवरून १ मिनिटें व ३५ सेकंदांत चालून गेला. ती दोरी ३०० यार्ड लांब होती, तेव्हां अर्थात तो अगदीं त्या दोरीवरून धांवतच गेला असें दिसतें. नंतर त्यानें एक लहानशी शेगडी आपल्याबरोबर नेऊन दोरीच्या मध्यावर गेल्यावर थोडेसें अन्न ऊन ऊन करून त्यानें खाल्लें त्याचप्रमाणें एकदां त्यानें एक खुर्ची बरोबर नेऊन त्या दोरीच्या मध्यावर समतोल ठेवून तिजवर बसून अगदीं स्वस्थ चित्तानें चिरूट ओढला! द्वापारयुगीच्या गोष्टीप्रमाणें गोष्टी वाटतात, पण खऱ्या झाल्या ह्मणून लिहितात.

करम०

असामांत जे गोरे लोक चहाची शेती करून त्याचा व्यापार करितात ते हिंदुस्थानांत आपले दलाल पाठवून मजूर लोकांना थापा मारून असामांत नेतात. ते बिचारे मजूर परदेशांत गेल्यावर सर्वस्वी त्यांच्या स्वाधीन होतात पण त्यांचे गोरे यजमान इतके निष्ठूर असतात कीं, ते या हिंदुस्थानांतून फुस लावून नेलेल्या मजुरापासून गुरासारखें काम घेऊन त्याच्या पोटालाहि पोटभर भाकर देत नाहींत.

मंत्री

स्वामी विवेकानंद यांनीं वैदिक हिंदु तत्वें अमेरिका देशांत फैलावून परमार्थ निरूपणानें सर्व लोक नादाऊन सोडले आहेत. कित्येक स्त्रिया विवेकानंदाच्या दासी बनून धर्मात धर्म वैदिक धर्म अशी खात्री करून देऊन आतां उपनिषदाच्या अंगानें उपदेशाचा मारा चालू केला आहे.

न्या. सिं.

एक दोन कलेक्टरच्या जागा नेटिव्हांना मिळाल्या किंवा कायदे कौन्सलांत प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला, किंवा पार्लमेंटात दादाभाई सारखा एखादा शिरला एवढ्यावर आह्मी भुलून जातां उपयोगी नाहीं. एकंदर स्थितीवरून व हल्लीं जी आह्मास गरिबी आली आहे तीवरून व पुढें सारखें धन जात राहणार ह्यावरून आमचा लय लय होणार असें अनुमान करण्यास कांहींच अडचण दिसत नाहीं. द्रव्य जाण्याचा मार्ग कमी करून ह्मणजे यंत्रज्ञान देऊन आमच्याच देशांत कारखानें घालून आमची तरूण पोरें सरकारानें अडकवून टाकली तर मात्र लयाची भीति बाळगण्यास नको. आमचे जिणें तूर्त निवळ व केवळ आमच्या सरकाराच्या कृपेवर अवलंबून आहे. ह्या ग्रहदशेंतून आमचे आह्मीच पार पडण्याला कांहीं एक उपाय नाहीं.

दे०

हल्लींचे सेक्रेटरी ऑफ स्टेट मि० फौलर यांचे मनांत आपल्या इंडिया कौन्सिलाला कांहीं तरी अन्वर्थतः आणावी; आणि त्यासाठीं हिंदुस्थानांतील तीन मुत्सद्दी पुरुष इंडिया कौन्सिलांत मंत्री ह्मणून नेमावयाचे आहेत. बंगाल इलाख्याचे तर्फे बाबू उमेशचंद्र बानरजी, मुंबई इलाख्याचे तर्फे मि० बद्रूद्दीन तय्यबजी आणि मद्रास इलाख्याचे तर्फे नामदार शंकर नायर ह्या तीन गृहस्थांस इंडिया कौन्सिलचे मेंबर निवडावयाचें आहे.

वांईच्या म्यु० ने श्री० तात्या साहेबपंत राजाज्ञा यांस व्हा. प्रेसिडेंट निवडलें होतें, पण द्यारांच्या खटल्यांत ते गुन्हेगार ठरले आहेत. सबब दुसरा व्हा प्रे० निवडावा ह्मणून मे० कलेक्टर साहेब यानकडून म्यु० स लिहून गेल्याचें कळतें. तेथील सस्पेंड केलेले फडणीस मि. देशमुख यांनवरील खेत्या साक्षी बद्दल फिर्याद करण्याचा रुकार मजूर अपिलांत सेशन जज्जानीं रद्द केला.

क त.

मुंबईसरकार खालीं लिहिलेल्या सूचना अमलांत आणील काय?

१ प्राव्हिन्सियल सर्व्हिसकरितां कांपिटिटिव परिक्षा नेमावी. या परिक्षेंत बी. ए. झालेल्या लोकांस बसण्याची परवानगी असावी.

२ मामलेदार लोकांसही ही परिक्षा देण्याची परवानगी असावी.

३ लहान नोकरांसही बढती मिळून शेवटीं या परिक्षेस बसण्याची परवानगी असावी.

४ अमके लोक अशिक्षित ह्मणून त्यांस खुष करण्या करितां परिक्षेची अट लागूं न करितां मोठाल्या जागा देऊं नयेत.

रंगून येथें एक नवीन एन्जीनियरिंग शाळा स्थापन झाली असून त्यांत सध्यां चार ब्रह्मी व दोन युरोपियन विद्यार्थी आहेत.

भा .व.

बंगाल प्रांतांतील काल्लीकत येथील पुजाऱ्यानें आपल्या तरुण मुलाचें लग्न त्याच्या अंगी स्त्री पोषणाचें सामर्थ्य येईपर्यंत करण्याचें नाकारल्या वरून त्या मुलानें फांस घेऊन आत्महत्या केली!

जडाहकडील बेदुईन जातीच्या आरबांनीं इंग्रज, फ्रेंच व रशीयन एलची यांजवर खुनी हल्ला केल्या कारणानें त्यांजवर इंग्रजांनीं पाठविलेल्या तीन लढाऊ गलबतांच्या मदतीस फ्रेंचांनींही आपलीं दोन लढाऊ गलबतें पाठविलीं आहेत.

रशियन सरकार ट्रान्स क्यास्पियन रेल्वे मारघीलीच्या टोकापर्यंत व तेथून उरतुबपर्यंत नेण्याचा विचार करीत आहे. उरतुब्याचें टोंक चित्राल जवळ ८० मैलांच्या अंतरावर आलें आहे.

शेंकडा, ४६ मिटर गळा व छातीच्या रोगानें मरतात. त्यांच्यावर विचारशक्ती व धास्तीचा विशेष परिणाम होत असतो. त्यांचें काम एकंदर सर्व लोकांच्या कल्याणाचें असतें. त्या साठीं त्यांच्या हितासाठीं सर्वांनीं जपलें पाहिजे.

स. बि.

सर लिपेल ग्रिफिन ह्मणतात कीं, हिंदुस्थानचें उत्पन्न वाढविण्यास तंबाखूवर आणि लग्नांवर कर बसवावे. बरें नाहीं.

अमिरपुत्र इंग्लंडांत आपल्या परिवारासह बकरीदच्या समारंभा करितां वोकिंग येथील मुसलमानी मशिदींत गेले.

ब्रह्मदेशांतील इंग्रज कामदार जे बिनी भाषा शिकून त्या परिक्षेंत पास होतील त्यांस २,००० रुपये इनाम देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

मादागास्करावर गेलेले फ्रेंच लोक तेथील लोकांस तेथील राजाच्या विरुद्ध बंड करण्यास चिथवीत आहेत!

टर्कीच्या ताब्यांतील अर्मेनियन प्रांतांतील ख्रिस्तीप्रजेवर टर्कीच्या कामदारांनीं कहर केल्याचें जे प्रसिद्ध झालें त्या बाबतींत त्या प्रांताची अमुक प्रकारें व्यवस्था करा अशा बद्दल फ्रान्स, रशिया व इंग्लंड या तिघांनीं मिळून टर्कीस एक पत्र लिहिलें व त्याचें उत्तर योग्य मुदतींत टर्कीनें दिलें नाहीं व त्या संबधोंन इंग्लडची कांहीं फौज त्या दिशेस रवाना झाली.

अ०

बेळगांव जिल्ह्यांत थोड्याच दिवसांमध्यें सु० १५०० हत्यारांचे परवाने काढून घेण्यांत आले. असें यंदाच्या प्रांतिक सभेंत आन० मि. नातू हे बोलले; हे परवाने काढून घेण्याचे कारणाच्या संबधानें लोकांच्या बोलण्यांत असें आहे कीं,— गांवकरी लोक वाघ वगैरे जनावरांना गोळ्या घालून मारतात, आणि त्या मुळें साहेबांना शिकार करण्यास मिळत नाहींत, ह्मणून ही परवाने काढून घेण्याची युक्ति काढण्यांत आली. हें कारण आमच्यानें खरें ह्मणवत नाहीं. सरकारांतून खरें कारण सांगण्यांत येईल तर लोकभ्रम दूर होण्यास त्याचा उपयोग होईल.

स. शो.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

### कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक

वाशिम, वऱ्हाड.


## 'SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion

The House of Commons

1895

Mr. Naoroji— Civil Service ( India') (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळलीं पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."


जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपल कमेटीचें हद्दींतील बारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९५।९६ इसवी सालाबद्दल ता. २ माहे जुलै सन १८९५ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९५

Gopal Hari.

सेक्रेटरी- मुनसिपाल कमिटी

आकोला


☞ हें आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ESTABLISHED IN 1880.

## HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

### जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

### विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें कंपेरं, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धांशीशि, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हाताम कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरें झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतात.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठ्यांस किं. रु १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०


---


## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणे आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.


---

नंबर १४३

सन १८८१ चा अक्ट ५ प्रमाणे ( वर्ग १९ ) वि. की. मि. नंबर १/१८९५

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव कौसल्या
मर्द मुकाजी कुणबी
राहणार बोराळ प्र. अंजनगांव ता. दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांस मयत

मुकाजी बापाचें नांव बावुजी कुणबी राहणार बोराळ प्रगणें अंजनगांव ता० दर्यापूर जि० एलिचपूर यानें करून ठेविलेल्या मृत्यु पत्रा प्रमाणें प्रोबेट सरटाफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १० माहे जुलै १८९५ इसवी रोजीं अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २० माहे मे सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Offg. Deputy Commissioner.
दि० नजन एलिचपूर.

---

### नोटीस

तुकाराम वल्लद बुदाजी पाटील राहणार किन्ही परगणे गेरू माटरगांव तालुके चिखली. यांस.

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं तुमची वऱ्हाड समाचार पत्रांतली तारीख ३० मे १८९५ ची नोटिस पावली. नोटिसीचा जबाब असा कीं.

(१) तुह्मी माझे जवळचे वारसदारा पैकीं कोणी नाहीं. आणि तुमचा माझ्या इस्टेटीवर कोणत्याहि प्रकारचा हक्क नाहीं. माझ्या पश्चांत जो योग्य वारसदार सरकार ठरवील तो इस्टेटीचा उपभोग घेईल. पुन्हा अशी नोटिस विनाकारण देऊं नये.

( २ ) स्थावर जंगम इस्टेट माझ्या नवऱ्यानें मिळविली आहे तिच्यावर वडिलार्जितपणाच्या सबबीवर कोणत्याही प्रकारें कोणाचा हक्क चालणार नाहीं.

( ३ ) मी माझ्या नवऱ्याच्या इस्टेटीला पूर्ण वारस व मालक आहे. माझ्या हयातींत मी कायदेशीर रीतीनें इस्टेटीचा उपभोग व ययाधिकार व्यय करीत जाईन.

( ४ ) माझ्या वारसदारीच्या हक्काला नोटिशीनें किंवा फिर्यादीनें व्यत्यय आणाल तर त्याची जबाबदारी तुमच्या माथीं राहून तुह्मास नुकसान या नोटिशीच्या खर्चासह भरून द्यावे लागेल. इतःपर पत्रें, नोटिसा वगैरे पाठवूं नये. काय करणें असेल तें कोर्ट मार्फत करावें. कळावें. १४ जून सन १८९५ इसवी.

(सही) कमळजा मर्द सिधु पाटील राहणार किन्ही, गेरु, माटरगांव तालुके चिखली इच्या हातची निशाणी खुद.